१८०-१८९

# कमला



# अजिंक्यपद विजेते संघ



प्राचार्यांसमवेत झोन अजिंक्यपद मिळविलेला सिनिअर बास्केटबॉल संघ



प्राचार्यांसमवेत ॲथलेटिक्स झोन ४ X ४०० मी. रिले प्रथम क्रमांक व ४ X १०० मी. रिले द्वितीय क्रमांक मिळवलेला सिनिअर संघ

॥ निर्मातुं शिवं सुंदरम् ॥

# कमला

## ताराराणी विद्यापीठाच्या

## कमला महाविद्यालयाचे

# नियतकालिक

सहावा अंक

१९९०–९१

# • कमला १९९०–९१

अध्यक्ष : प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील

प्रमुख संपादक : प्रा. सुमती साळुंखे

---

---

## विभागीय संपादक

मराठी विभाग : प्रा. जे. बी. शिंदे

हिन्दी विभाग : प्रा. सौ. सुमित्रा पोवार

इंग्रजी विभाग : प्रा. सुमती साळुंखे

---

---

विद्यार्थिनी प्रतिनिधी : कु. कल्पना खोत, कु. ज्योती उगळे

---

– या अंकात प्रसिद्ध (व्यक्त) झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. –

# ताराराणी - महाराष्ट्र अस्मिता



सम्राज्ञी ना, समर कुशला लोकनेत्री प्रतापी
सत्तांधाना नमवुनि रणीं आपुले राज्य स्थापी
नारी नोहे अमर जगतिं ज्योत ही पौरुषाची
ताराराणी जननि अमुच्या अस्मितेची, यशाची

— गदिमा

# ताराराणी विद्यापीठाच्या स्फूर्तिदेवता



कै. सौ. सरोजिनीदेवी तथा कमला विश्वनाथ पाटील

(जन्म २८-४-१९०९ मृत्यू १८-७-१९६९)

## अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा



**मा. डॉ. व्ही. टी. पाटील**

संस्थापक अध्यक्ष - ताराराणी विद्यापीठ

## आमचे मार्गदर्शक




प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील

एम. ए., पी एच. डी.

# संपादकीय . . . . .

कमला ९१ चा हा अंक विद्यार्थिनींना सादर करताना संपादक मंडळाला अत्यंत आनंद होत आहे. महाविद्यालयाच्या वार्षिकाचे प्रयोजनच मुळी विद्यार्थिनींच्या लेखन व कला गुणांना वाव मिळवून देणे हे आहे. महाविद्यालयातील वर्षभराच्या ·घडामोडींचा चालता बोलता आलेखही आपणास यांत पहावयास मिळतो. हा अंक तयार करताना लेखनाबाबत विद्यार्थिनींनी दाखवलेला उत्साह व घेतलेले परिश्रम वाखा-णण्याजोगे आहेत. त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच ! कमला–९० या अंकातील कु राजनंदा देशमुख, कु, मृगनयना खाबडे व कु. विशाखा शिंदे यांच्या लेखांना पारितोषिके मिळाली. त्यांचे हार्दिक अभिनंदन करणे इथे उचित ठरेल.

१९८४ साली स्थापन झालेल्या आमच्या महाविद्यालयाने अल्पावधीतच शिक्षण क्षेत्रात भोठी भरारी मारली आहे. सध्या विद्यार्थिनींची संख्या तेराशेच्या पुढे गेली आहे. संख्यात्मक वाढीबरोबरच, गुणात्मक वाढही महाविद्यालयाने केली आहे हे विविध वर्गांच्या निकालांवरून स्पष्ट होते.

| | |
|---|---|
| १२ वी कला– | ८६ टक्के |
| बी. ए. भाग– १ | ९९ टक्के |
| बी. ए. भाग– २ | ९० टक्के |
| बी. ए. भाग– ३ | ८६ टक्के |
| १२ वी वाणिज्य | ८५ टक्के |
| बी. कॉम भाग– १ | ७९ टक्के |
| बी. कॉम भाग– २ | ९० टक्के |
| बी. कॉम भाग– ३ | ७४ टक्के |

आजचे युग हे विज्ञानयुग, विज्ञानामुळे मानवाच्या जींवनात आमूलाग्र बदल घडवला गेला आहे. त्याचमुळे विज्ञान शिक्षण हे अगदीं जरुरीचे आहे व यापासून आमच्या विद्यार्थिनी पारख्या राहू नयेत म्हणून आमच्या महाविद्या-लयाने विज्ञान शाखेचा शुभारंभ या वर्षापासून केला आहे. ११ वी विज्ञान हा वर्ग सुरू केला असून त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

या वर्षी प्रा. श्रीमती एन. एस. धुमाळ (इंग्रजी), प्रा. श्रीमती एस. एल. देसाई (मराठी) व प्रा. श्रीमती आर. व्ही. अंबवडे ( अर्थशास्त्र ) यांनी एम. फिल्. पदवी प्राप्त केली त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंद !

महाविद्यालय नेहमीच नवनवीन उपक्रम करण्यामध्ये आघाडीवर असते. या वर्षी प्रौढ व निरंतर शिक्षण कार्यक्रमांतर्गत बेकरी व कन्फेक्शनरी हा कोर्स चालू केला गेला. त्याच बरोबर गतवर्षाप्रमाणे ज्यूडो कराटे चे वर्ग घेतले गेले. भद्रकाली ताराराणी व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प डॉ. वसंतराव कदम, प्राध्यापक, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ यांनी गुंफले.

'कमला' परिपूर्ण करून घेण्यात आमचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर विभागीय संपादक प्रा. जे. बी. शिंदे (मराठी) व प्रा. श्रीमती सुमित्रा पोवार (हिंदी) यांचेही सहाय्य झाले.

राजहंस प्रेस, कोल्हापूरचे श्री. श्री. सी. गोसावी व त्यांचे सहकारी यांनी अंक छपाईचे काम तत्परतेने केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**प्रा. सुमती राजाराम साळुंखे**
प्रमुख संपादिका

दि प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट
नियम ८, फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक असलेली माहिती

प्रकाशन स्थळ – ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रकाशन काळ – वार्षिक

मुद्रकाचे नाव – श्री. श्री. सी. गोसावी, राजहंस प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर

राष्ट्रीयत्व – भारतीय

पत्ता – २५० ब/२७, नागाळा पार्क, कोल्हापूर

प्रकाशकाचे नाव – प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील

राष्ट्रीयत्व – भारतीय

पत्ता – कमला महाविद्यालय. ताराराणी विद्यापीठ, राजारामपुरी, कोल्हापूर.

संपादकाचे नाव – प्रा. सुमती रा. साळुंखे

राष्ट्रीयत्व – भारतीय

पत्ता – कमला महाविद्यालय, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

मालकी – कमला महाविद्यालय, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

मी डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील



गायत्री एम्. वडोंगेकर बी. कॉम. १

# मराठी विभाग

# अ नु क्र म णि का

## गद्य विभाग


| | |
|---|---|
| १) बंडखोर ज्ञानेश्वर ( वैचारिक लेख ) | कु. राजश्री पाटील |
| २) निराशेने वेढले बालकवींना | कु. कविता तोरो |
| ३) प्रागतिक विचारांचा दिग्दर्शक : डॉ. व्ही. शांताराम | कु. कल्पना कदम |
| ४) चिरमुऱ्यांच्या चार दाण्यांसाठी ( लघुकथा ) | कु. विशाखा मोहिते |
| ५) म. फुले यांचा समताविचार ( वैचारिक लेख ) | कु. राजनंदा देशमुख |
| ६) पुरे झाले हे धार्मिक उत्सव ( समस्या लेख ) | कु. अपर्णा पाध्ये |
| ७) बोनसाय ( स्त्री-मुक्तीसंबंधी लेख ) | कु. ज्योती उगळे |
| ८) लोकशाही व सामाजिक समता | कु. उषा पाटील |
| ९) भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर | कु. कल्पना खोत |
| १०) गोकुळ प्रकल्प : एक अभ्यास भेट | कु. राणी साळोखे |
| ११) वाघोबांचा कलाविष्कार ( एक टिप्पणी ) | कु. सुरेखा जामसांडेकर |
| १२) प्रबल जीवनाचा फुलोरा ( लोकसंख्या शिक्षण लेख ) | कु. लता निंबाळकर |
| १३) पंजाब व काश्मीर प्रश्न ( समस्या लेख ) | कु. नूतन ओतारी |


## पद्य विभाग


| | |
|---|---|
| १) जीवन | कु. सुनिता पाटील |
| २) पापण्यांच्या शिंपल्यातून | कु. स्वाती महाबळ |
| ३) रिता गाभारा | कु. संगीता पोळ |
| ४) हे नुसतं बोलायचं असतं | कु. भाग्यश्री शिंदे |
| ५) कविता | कु. उषा पाटील |
| ६) स्वप्न | कु. कुमुदिनी पाटील |
| ७) मी गप्प राहणार नाही | कु. हसीना जमादार |

ज्ञानेश्वरी सप्तशताब्दीनिमित्य खास लेख

# बंडखोर ज्ञानेश्वर

**कु. राजश्री अनंत पाटील**
प्रथम वर्ष कला

"बंडखोर ज्ञानेश्वर" हे शीर्षक पाहून आश्चर्य वाटलं ना तुम्हाला ? कारण तुम्ही म्हणाल की ज्ञानेश्वर हे संत होते, वारकरी होते. पण आज मी अगदी आत्मविश्वासाने सांगते आहे की ज्ञानेश्वर बंडखोरदेखील होते. त्यांनी कर्मठ समाजाविरुद्ध, सनातन्यांविरुद्ध त्याकाळी एकप्रकारचे बंडच पुकारले होते. असे हे थोर संत आणि बंडखोर ज्ञानेश्वर महाराष्ट्रात होऊन गेले. महाराष्ट्र ही शूरांची आणि संतांची भूमी आहे. यापैकी ज्ञानेश्वर हे अग्रक्रमांकी असणारे संत.

संत ज्ञानेश्वरांचा जन्म आपेगाव येथे इ. स. १२७५ साली झाला. विठ्ठलपंत कुलकर्णी आणि रुक्मिणी हे त्यांच्या आई–वडिलांचे नाव. निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई ही चार अपत्ये विठ्ठलपंतांना झाली. प्रथम संन्याशाश्रम स्वीकारलेल्या विठ्ठलपंतांनी नंतर गृहस्थाश्रम स्वीकारला, म्हणून गावातील कर्मठ ब्राह्मणांनी त्यांना देहदंडाचे प्रायश्चित घेण्यास भाग पाडले. मग ही चार मुले उघड्यावर पडली.

## बंड करण्याची पूर्वपीठिका

ज्ञानेश्वरांच्या वडिलांनी म्हणजे विठ्ठलपंतानी प्रथम संन्याशाश्रम स्वीकारला. पण नंतर त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला तेव्हा त्यांना ही चार अपत्ये झाली. पण संन्याशाची मुले म्हणून ज्ञानदेवादी भावंडांचा छळ सुरू झाला. त्यावेळी विठ्ठलपंत व रुक्मिणी यांनी ब्राह्मणांच्या सांगण्यावरून देहांत-प्रायश्चित घेतले आणि ही चार मुले अनाथ झाली. आईवडिलांनी देहांत–प्रायश्चित घेऊनसुद्धा ब्राह्मणांनी त्यांचा छळ थांबविला नाही.

तसेच ज्ञानदेवांची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. ही चार भावंडे भिक्षा मागून निर्वाह करीत होती. एकदा मुक्ताईला धिरडे खाण्याची इच्छा झाली. पण कुंभाराने तिला धिरडे भाजण्याचे भांडे दिले नाही. तेव्हा ज्ञानदेवांनी आपल्या योगसामर्थ्याने आपली पाठ तापविली व मुक्ताईने त्यावर धिरडे भाजले, अशी दंतकथा आहे. यातून त्यांची गरीबी स्पष्ट होते.

पण ज्ञानदेव, भिक्षार्थी व अनाथ अशा जीवनात होणारे अपमान व सामाजिक त्रास यामुळे चिडले. ज्ञानेश्वर योगी होते; संयमी होते. एके दिवशी ते विलक्षण चिडले व आपल्या झोपडीत दार लावून बसले. मग मुक्ताबाईने त्यांची समजूत घातली तेच ताटीचे अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत.

**गिरी–गव्हरे कशासाठी । रागे पुरविली पाठी ।**
**ऐसा नसावा संन्याशी । परमार्थाचा जो का द्वेषी ।**
**घर बांधिले डोंगरी । विषया हिंडे दारोदारी ।**
**काय केला योगधर्म । नाही अंतरी निष्काम ।**
**गंगाजळ हृदय करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।१।।**

° ° °

**अहो क्रोधे यावे कोठे । अवघे आपण निघोटे ।**
**ऐसे कळले उत्तम । जन तेचि जनार्दन :**
**ब्रीद बांधिले चरणी । नये दाविता करणी ।**
**वेळ क्रोधाचा उगवला । अवघा योग फोल झाला ।**
**ऐसी थोर दृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।२।।**

मुक्ताईने समजूत घालेपर्यंत ज्ञानेश्वर का एवढे चिडले होते ? त्याचा बारकाईने अभ्यास केला तर दिसून येईल की, त्यावेळचा समाजच पूर्ण दोषी आहे व त्याने या भावंडांना नको तेवढे छळले.

तसेच ज्ञानदेव किंवा त्यांच्या भावंडांची मुंज वगैरे विधी करण्यासाठी वैदिक ब्राह्मणांनी नकार दिला. त्यावेळी क्षत्रियांची देखील मुंज होत होती; पण या मुलांची मुंज वगैरे झाली नाही.

या सर्व कारणांमुळे ज्ञानेश्वर बंड करण्यास प्रवृत्त झाले. हे एकप्रकारे योग्यच होते.

## रुढी व परंपरा याविरुद्ध बंडाची तयारी

ज्ञानदेवांनी जोरदार बंड सुरू केले. त्यावेळी वैदिकब्राह्मण संस्कृतभाषाच श्रेष्ठ मानत होते. अस्पृश्यांना किंवा सर्वसामान्यांना संस्कृतभाषेचे पाठपठन

करण्याचे अधिकार नव्हते. ज्ञानेश्वरांनी प्रथम मराठी-भाषेचा स्वीकार करून वैदिकब्राह्मणांना धक्का दिला. ही बंडाची पूर्वतयारी होती. त्यांनी संस्कृत भाषेला विरोध केला, असे त्यांनी मराठी भाषेतून लिहिलेल्या ज्ञानेश्वरीने सिद्ध केले आहे.

ज्ञानदेवांनी आणखी एक बंडखोर कार्य केले. ते म्हणजे त्यांनी वारकरी संप्रदायाची अगर भागवत धर्माची स्थापना केली. या संप्रदायामध्ये वेगवेगळ्या जातींचे लोक होते. त्यांच्यात जातिभेद नव्हते. ते ईश्वरभक्तीत तल्लीन व्हायचे म्हणून म्हणतात,

**"खेळ मांडियेला वाळवंटी घायी,**
**नाचती वैष्णव भाई रे ।"**

अप्रत्यक्षपणे त्यांनी हिंदूधर्माला विरोध केला. ज्ञानेश्वरांनी जाती-पाती कधी मानल्या नाहीत. जातिभेद न करता सर्वांना मंदिरात, देवळात प्रवेश मिळावा असे त्यांचे मत होते व त्या काळात ते जरी मान्य नसले तरी ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदाय स्थापन करून जातिभेद मोडण्याचे बंड केलेच. त्यांनी सनातन हिंदुधर्माला जबरदस्त तडाखा दिला होता.

ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेल्या भागवतसंप्रदायाचे "पंढरीचा पांडुरंग" हे आद्य दैवत. सगुण आणि निर्गुणवादाची निरर्थकता त्यांनी काही अभंगांतून पटवून दिली आहे.

**"सगुणाची सेज । निर्गुणाची बाज ।**
**सावळी विराजे कृष्णमूर्ती ।"**

म्हणजेच सगुणभक्ती ही ज्ञानेश्वरांच्या पूर्वीच्या काळातील एक अनिष्ट अशी गोष्ट होती. वैदिक किंवा हिंदू धर्म मानणाऱ्यांनी यज्ञयाग व मूर्तीपूजा यांचे थोतांड निर्माण करून पूजापाठ व अभिषेकादी कार्यातून सामान्यांचे शोषण सुरू केले होते. ज्ञानेश्वरांनी सगुण भक्तीतून निर्गुण भक्तीकडे आपले विचार वळवून एकप्रकारचे वैचारिक बंड केले.

अशाप्रकारे ज्ञानेश्वरांनी भाषिक व तात्विक बंड उभारले. त्यांनी वयाच्या १६ व्या वर्षी म्हणजे इ. स. १२९० मध्ये ज्ञानेश्वरी लिहिली ती सर्वसामान्यांसाठी. ज्ञानेश्वरांचे ग्रंथ पंडिती वळणाचे नव्हते. म्हणून हे ग्रंथ नवे नवे मार्ग दाखवीत आबालवृद्धांपर्यंत पोहोचले. याबाबत ज्ञानेश्वरांनी पूर्वकाळातील गौतमबुद्ध व समकालीन महानुभावपंथी उदारमतवादी संतांचे अनुकरण केले.

ज्ञानेश्वरांनी आपला ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सर्वसामान्यांना समजावा म्हणून मराठी भाषेतून लिहिला. पण वैदिक ब्राह्मणांनी या ग्रंथाला तो मराठीत असल्याने तुच्छ लेखले. तेव्हा त्यांचा भ्रम तोडण्यासाठी ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव हा ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिला आणि आपल्यालादेखील संस्कृत भाषा येते हे समाजाला दाखवून दिले. अशाप्रकारे ज्ञानेश्वरांनी भाषिक व तात्विक बंड केले. हिंदूधर्माचा निषेध केला आणि जाती-पाती, उच्च-नीच असा भेद न मानणाऱ्या भागवत धर्माची स्थापना करून त्याकाळच्या वैदिक समाजाविरुद्ध बंडच केले. त्यांनी हिंदूधर्म मानला नाही.

अशातऱ्हेने ज्ञानेश्वर हे योगी होते, संयमी होते. त्यांना मराठी साहित्याचे आद्यप्रवर्तक मानले जाते. त्यांच्यामुळे मराठी भाषेला महत्त्व प्राप्त झाले. जर त्यांनी आपले बंड उभे केले नसते, तर मला वाटते, आज मराठी भाषा अस्तित्वात देखील राहिली नसती. त्यांना आजही क्रांतदर्शी तत्त्वज्ञ, प्रतिभासंपन्न साहित्यिक आणि प्रभावी नीतीशिक्षक मानले जाते, असा बंडखोर पुन्हा होणे नाही. म्हणून मला म्हणावेसे वाटते –

**"झाले बहू, होतील बहू**
**परि यासम हाच ।"**

## ॥ राजर्षि छ. शाहू महाराज गौरवांजली ॥

कार्लाईलने विभूति-मंडळात राजालाही स्थान दिले आहे. शिवाजी महाराजांप्रमाणे शाहू महाराज हेही दिव्य विभूती होती. आणि विभूती-मंडळात शाहू महाराजांचे आसन आपल्या विशिष्ट तेजाने व स्वतंत्रपणे निरंतर चमकत राहील.

**संजीवनकार श्री. द. भि. रणदिवे**

**बालकवी जन्मशताब्दीनिमित्य खास लेख**

# निराशेने वेढले बालकवीला

**कु. कविता मा. तोरो**
द्वितीय वर्ष कला

मराठीचे सर्वश्रेष्ठ निसर्गकवी म्हणून बालकवी साऱ्या काव्यरसिकांना सुपरिचित आहेत. किंबहुना रांगड्या मराठी मनाला निसर्गाच्या अलौकिक रूपाचे सूक्ष्म चमत्कार बघायला त्यांनीच शिकविले आहे; परंतु त्यांच्या कवीमनाचा थोडासा आढावा घेतला तर त्यांच्या काही कवितांमधून त्यांच्यात विषण्णतेची दाट छाया आहे याची कल्पना येते. त्यांच्या या विषण्ण मनोवृत्तीचे दर्शन घडविणारा हा लेख.

बालकवींचा ( त्र्यंबक बापूजी ठोंबरे ) जन्म १३ सप्टेंबर १८९० साली खानदेशात धरणगाव येथे झाला. खानदेशातील खेड्यापाड्यात प्राथमिक शिक्षण संपल्यावर बालकवी इंग्रजी शिक्षणासाठी धुळ्यास गेले. १९०७ साली जळगावला पहिले महाराष्ट्र कवीसंमेलन भरले होते. या संमेलनात पोरवयातील बालकवींनी धीटपणे काव्यवाचन केले.

**"अल्पमति मी बालक, नेणे काव्यशास्त्र व्युत्पत्ति ।**
**कविवर्यानो मदिय बोबडे बोल धरा परि चित्ती ।।"**

या संमेलनाने त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांना 'बालकवी' ही पदवी मिळवून दिली. बालकवीना कविता लेखनाचा छंदच होता. प्रामुख्याने त्यांनी निसर्ग-कवितांचे लेखन केले आहे. पण त्याबरोबरच त्यांनी चिंतनविषयक, काव्यविषयक, प्रेमविषयक आणि आत्मनिष्ठ कवितांही लिहिल्या आहेत. बालकवींच्या वैयक्तिक जीवनाचा थोडासा आढावा घेतला तर त्यांच्या काही कवितांवर विषण्णतेची, उदासीनतेची अशी दाट छाया का आहे याची कल्पना येते. बालकवींची ही उदासीनतेची गाणी त्यांच्या निसर्गविषयक व प्रेमविषयक कवितांपेक्षा अधिक जिव्हाळ्याची असून अथांग करुणरसाने परिप्लुत आहेत.

वडिलांच्या मृत्यूनंतर बालकवींच्यापुढे भवितव्याचा मोठा प्रश्न आ वासून उभा होता. त्यावेळच्या त्यांच्या संभ्रमित मनाच्या अवस्थेचे चित्र 'दुबळे तारू' या कवितेत चितारले आहे. संसाराच्या क्षुब्ध समुद्रात माणसाचे जीवन म्हणजे शीड नसलेल्या नौकेसारखे. सदा हृदयाला लागलेली भीतीची जाचणी, मनाची झालेली भ्रमिष्ट, गोंधळल्यासारखी अवस्था शिवाय चित्ताला चिंता जाळते आहे. हे जीवरूपी समुद्रातील तुफान कवीच्या हळव्या, कोमल, स्वप्नाळू मनोवृत्तीला असह्य होते. बालकवींनी आपल्या मन:स्थितीचे वस्तुनिष्ठ चित्रण केले आहे. ते म्हणतात, 'हा जीवन प्रवास म्हणजे यमाचा दरबार आहे.' त्यामुळे तो मध्येच सोडून द्यावा असे त्यांना वाटते.

**नको नको हा प्रवास याचा,**
**अब्धि नव्हे, दरबार यमाचा,**
**सोडुनि द्यावा पंथचि याचा,**
**कसे हाकारूं । शिडाविण दुबळे तारूं ?**

त्यांच्या निरागस, संवेदनशील परंतु दुबळ्या मनाला व्यावहारिक जीवनाचे आघात सहन करण्याइतके किंवा त्यावर मात करण्याइतके त्यांच्यात सामर्थ्य नव्हते. किंबहुना त्यांच्या जीवनविषयीच्या 'किंकर्तव्यमूढ' स्थितीचा 'दुबळे तारूं' या कवितेतून आविष्कार होतो.

आपल्या बरोबरचे आप्तमित्र, सगे–सोयरे कितीतरी पुढे गेले आणि आपण मात्र मागेच राहिलो याची खंत त्यांच्या मनाला वाटत होती. 'तेजाचा प्राण' किंवा 'संध्येचा दूत' वाटणारा बालविहग हा छोटासा पक्षी निळ्याभोर आकाशात मुक्तपणे विहार करीत असताना बालकवींनी पाहिले आहे. आपणाला त्याच्यासारखे जगता येत नाही ही खंत त्यांच्या मनाला जाचत असल्यामुळे ते त्याला उद्देशून म्हणतात,

**' भ्राते माझे वातावरणी तुजपरि भिरभिरती**
**पंख तुटुनिया विव्हल पडलो मी धरणीवरती.'**

बालकवींना आपल्या बंधनाची, अशांतीची आणि अपूर्णतेची दु:खदायक जाणीव होते.

' शून्य मनाचा घुमट ' या कवितेत बालकवींनी आपल्या अस्वस्थ मनस्थितीचे दर्शन घडविले आहे. यासाठी त्यांनी घुमटाच्या कल्पनेचा आश्रय घेऊन म्हटले आहे की–

**' शून्य मनाच्या घुमटांत**
**कसले तरि घुमते गीत;**
**अर्थ कळेना कसलाही**
**विश्रांती परी त्या नाही;**

बाहेरून येणारे स्वर या घुमटात घुसतात आणि प्रतिसाद उत्पन्न करतात, परंतु भुतासारखी जगातली सारी रूपे, सारे ध्वनी, भेसूर स्वरूप धारण करून मनाच्या त्या घुमटात प्रवेश करतात. त्यामुळे बालकवींना तो घुमट नकोसा वाटतो. हा घुमट कुणी, कुणासाठी बनविला हेच मुळी त्यांना कळत नाही. या निष्फळतेमुळे ते अस्वस्थ झाले आहेत.

आपण दु:खाने भरलेल्या जगात नांदत आहोत याचीही जाणीव बालकवींना आहे. मानवी जीवनात अनेक प्रकारच्या उणिवा असून त्या कधीच पूर्ण होऊ शकणार नाहीत हे शल्यही त्यांच्या हृदयात रुतून बसलेले आहे. या दृढमूल झालेल्या विचारांमुळे त्यांच्या मनाला विषण्णता जाळीत आहे.

' उदासीनता ' या कवितेत ते म्हणतात, ' ही अंतरीची उदासीनता कुठून येते ? ' कळत नाही. हृदयाच्या अंतर्द्वंदाला काय बोचते ते कळत नाही. काय मिळवायचे तेही कळत नाही.

**' कोठुनि येते मला कळेना**
**उदासीनता ही हृदयाला**
**काय बोचते ते समजेना**
**हृदयाच्या अंतर्द्वंदयाला '**

अशा परिस्थितीत जिवाला चैन पडत नाही. बालकवींच्या अंतरातील ही तीव्र वेदना आहे.

मानवी जग पराकाष्ठेचे स्वार्थी असून या स्वार्थापायी अनेक दीनदुबळ्यांचे हाल होतात.

**' स्वार्थाच्या बाजारात किती पामरे रडतात.'**

असे बालकवी ' आनंदीआनंद ' या कवितेत म्हणतात. या मर्त्य जगात दु:खाचे भयानक डोह असल्यामुळे जीवाला समाधान व शांतता या गोष्टी दुर्लभ आहेत. असा विचार त्यांनी अनेक ठिकाणी व्यक्त केला आहे.

' आनंदी पक्षी ' या कवितेत ते म्हणतात,

**'आम्हाकरिता दुर्धर चिंता । नाना दु:खे हाल सभोंता ।**
**पुरे ! नको ही नरतनु आता । दु:खाची राशी ।।'**

अशा प्रकारे आम्हाला अनेक चिंता आणि हाल आहेत. या दु:खी आणि असह्य निराशांनी भरलेल्या मानवी जगाचा बालकवींना पावलोपावली प्रत्यय येत होता.

बालकवींनी निसर्गाचे वर्णन करीत असताना निसर्गाच्या ठायी भरलेले दिव्य सौंदर्य, आनंद आणि शांती व मानवी जगतातील विषण्णता इत्यादींचा आत्यंतिक विरोध स्पष्ट केला आहे.

' तडाग असतो तर ' या कवितेत सरोवराला आकाशातील सर्व सौंदर्य आणि शांती प्रतिबिंब रूपाने आपल्या अंत:करणात धारण करता येते. पण आपण मानव असल्याने आपल्याला रात्रीच्या वेळी आकाशात प्रकट होणारे शांत सौंदर्याचे भांडार आपल्या अंत:करणात सामावून घेता येत नाही ही खंत बालकवींनी प्रकट केली आहे.

**' या समयी जर तडाग असतो**
**रम्य दिव्य ते रेखित बसतो**
**हीच शांतता अशीच धरती**
**शुभ्र जलाच्या हृदयात.'**

मी स्वत:च जर तडाग ( तलाव ) असतो तर आकाशातील दिव्य रमणीय सौंदर्य माझ्या शुभ्र जलाच्या हृदयात रेखीत बसलो असतो. या कवितेतील त्यांच्या मनाची खंत प्रत्ययकारी वाटते.

'काळाचे लेख' या कवितेत बालकवी म्हणतात, ' पृथ्वीवर स्वर्ग अवतरण्यासाठी काळाने आकाशावर लिहिलेल्या नक्षत्रादी लेखांचे रहस्य लिहिले आहे. या आकाशावर काळाने जी शांती लिहून ठेवली आहे ती आम्हास मिळत नाही आणि या विश्वाच्या हृदयातील स्वर्गीय भाषांची त्यांनी रंगवलेली चित्रे आम्हास समजत नाहीत. हे मोठे दुर्दैव आहे. ' अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

**'विश्वाच्या हृदयातल्या निवडुनी स्वर्गीय भावांप्रती**
**चित्रे रंगविली तये, न कळती हा हंत आम्हास ती !'**

बालकवींना संसाराचे, जीविताचे क्षणभंगुरत्व जाणवू लागले होते. त्यामुळे त्यांच्या मनात निर्माण झालेली उदासीनतेची अस्पष्ट धूसर छटा 'अनंत' या कवितेतून दिसून येते. खिन्नपणा आपल्या निराश हृदयाला क्षणभरही सोडीत नाही असे त्यांनी पुनः पुन्हा केविलवाणेपणाने म्हटले आहे.

'यमाचे दूत' या कवितेत या साऱ्या उदासीनतेने, विषण्णतेने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे अशी चिंता व्यक्त केली आहे. यमाचे दूत मृत्यूची सावली होऊनच आले आहेत. गिरीशिखरावरून 'आ' पसरून हे अक्राळविक्राळ यमाचे दूत कवीला बोलवीत आहेत.

**'बोलवितात विक्राळ यमाचे दूत,**
**काळया अंधारात दडोनी**
**किंवा पडक्या बुरुजावरूनि.'**
**शब्द येतात । 'चल नको बसू जगतात.'**

परिस्थितीच्या कठोर भुतांच्या रूपाने हे यमदूत कवीला भेडसावतात. त्यांना शून्यमनस्क बनवितात.

नाजूक हृदयाच्या कवीला हा छळ सहन होत नाही. या औदासीन्याचा इतका अतिरेक होतो की कवीला मरणांची ओढ लागते. 'काळास' या कवितेत आपल्या विमनस्कतेचे स्वरूप कवीने अगदी स्पष्टपणे वर्णिले आहे. त्यांचे मन शून्य झाले आहे. या नैराश्याची भावना पराकाष्ठेची बळावल्यावर बालकवींनी मृत्यूचे आवाहन पुढील कारुण्यपूर्ण शब्दांत केले होते.

**'ये काळा ध्यान तुझे मात्र मला लागले !'**

---

## ॥ राजर्षि छ. शाहू महाराज गौरवांजली ॥

शाहू महाराजांच्या अंतःकरणात खोल कुठे तरीं म. फुलें यांच्या प्रेरणेंचा स्पर्श झाला. ते काही काळ झपाटले गेले आणि अनेक अभूतपूर्व सुधारणा त्यानी धडाक्याने सुरू केल्या. त्यात बहुजनसमाजाचे शिक्षण, त्याना शाळात बिनबोभाट प्रवेश, शिष्यवृत्या, वसतिगृहे, इत्यादींसाठी आपली राज्यकर्त्याचीं सारी शक्ती, अधिकार, साधनसामुग्री, त्यानी सर्वतोपरीं उपयोगात आणली. उच्चवर्णीय अधिकाऱ्यांचा, कारभाऱ्यांचा, शिक्षकांचा छुपा विरोध–असहकार त्यानी हाणून पाडला आणि एक प्रकारे बहुजन–समाजाच्या सामुदायिक प्रमाणावरील शिक्षणाचा पाया घातला.

**– कॉ. प्रभाकर वैद्य**

# प्रागतिक विचारांचा दिग्दर्शक 'डॉ. व्ही. शांताराम'

**कु. कल्पना वसंतराव कदम**
द्वितीय वर्ष कला

१९३० ते १९६० ही तीन दशके ज्यांनी आपल्या समाजाला रूढी–परंपरांना न मानवणाऱ्या, त्यांना धक्का देणाऱ्या अशा प्रखर प्रागतिक आचार–विचारांच्या चलचित्रकृती निर्माण करून सिनेमासृष्टीत खळबळ माजवली असे अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक व संकलक इ. सर्व गुणांनी संपन्न असलेले व्ही. शांताराम २७ ऑक्टोबर १९९० ला आपल्यातून निघून गेले. तरी त्यांचे वेगळेपण भारतीय सिनेमासृष्टीत अबाधित असेच आहे.

**"ऐ मालिक तेरे बंद हम,**
**ऐसे हो हमारे करम ।**
**नेकी से चले और बदी से टले,**
**ताकि हँसते हुए निकले दम ॥"**

" दो आँखे बारह हाथ " मधील ही मंगल प्रार्थना म्हणजेच व्ही. शांताराम यांच्या कलादालनातील कौस्तुभमणी. या चित्रपटातूनच त्यांनी उजाड माळ–रानात माणुसकीचा मळा फुलवला. आणि आपले वेगळेपण साऱ्या जगाला दाखवून दिले. १९५७ मध्ये तयार झालेल्या या चित्रपटातून त्यांनी सहनशीलता, समर्पण म्हणजेच अहिंसा हे गांधी–तत्त्व जरी यशस्वी–रित्या साकारले असले तरी या अहिंसावादाची दुसरी बाजू म्हणजे सहनशीलतेच्या पलीकडे अन्याय होत असल्यास हिंसेला हिंसेनेच उत्तर दिले पाहिजे हे दुसरे गांधी–तत्त्व साकारण्यात शांतारामांच्यातील दिग्दर्शक कमी पडला. असे असले तरी याच चित्रपटाने त्यांना जागतिक कीर्तीच्या शिखरावर नेऊन ठेवले. " १९५८ सालातील जगातील सर्वश्रेष्ठ चित्रपट " हा सन्मान हॉलीवूड आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेने त्यांना देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. शिवाय सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपटाचे ' राष्ट्रपतीपदक ' आणि सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचे ' राष्ट्रपती पदक ' ही याच चित्रपटाला मिळाले.

' सुरेखाहरण ' १९२०–२१ सालचा बाबूराव पेंढारकरांचा हा चित्रपटच भारतीय सिनेसृष्टीस 'व्ही. शांताराम' हे अमोल रत्न देऊन गेला. १८ नोव्हें. १९०१ साली कोल्हापूर येथे जन्मलेल्या शांताराम यांनी १९२७ मध्ये 'नेताजी पालकर' हा आपला पहिला चित्रपट निर्माण केला. त्यापाठोपाठ भारतातील पहिला रंगीत चित्रपट 'सैरंध्री' (१९३३) निर्माण करण्याचा मान त्यांनी मिळवला. त्यानंतर त्यांनी 'अमृतमंथन'ची निर्मिती केली. सर्व कुटिल, दुष्ट कृत्य करणाऱ्या, धर्मावरील अंधश्रद्धेमुळे प्रेरित झालेल्या स्वतःच्या विचारधारणेवर प्रचंड विश्वास असणाऱ्या राजगुरुचे पात्र या चित्रपटात शांताराम यांनी फारच वेगळ्या छटांनी रंगवले आणि धर्मनिष्ठेपायी स्वतःचं आत्म-बलिदान करणाऱ्या खलनायकाचे नव रूप प्रेक्षकांना पहायला मिळाले.

परंतु व्ही. शांताराम यांच्यातील प्रागतिक विचारांचा दिग्दर्शक उदयास आला तो त्यांनी १९३५ मध्ये निर्माण केलेल्या 'धर्मात्मा' (महात्मा –हिंदी) या चित्रपटाद्वारे. या चित्रपटात त्यांनी ब्राह्मण–दलित एकसमान दाखवण्याचा यशस्वी प्रयोग केला, परंतु त्याकाळातील व्यक्तींच्या पचनी न पडणारा असा हा विषय असल्याने त्यांना समाजाच्या छळाला तोंड द्यावे लागले. खुद्द त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्याविरुद्ध कट केला. त्यामुळे त्यांच्यातील दिग्दर्शकाला थोडी खीळ बसली. तरी १९३६ मध्ये त्यांनी जगातील तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक चित्रपट हा बहुमान मिळवणारा ' अमरज्योती ' हा चित्रपट काढला. ' व्हेनिस फिल्मोत्सवा ' साठी पाठविलेला तो पहिला भारतीय चित्रपट होता. भविष्यकाळाच्या पाऊलखुणा जाणून त्यांनी स्त्री–स्वातंत्र्य ही नवी विचारधारा या चित्रपटात साकारली होती.

पण खऱ्या अर्थाने ' प्रायोगिक चित्रपटांचा युगारंभ ' झाला तो त्यांच्या ' दुनिया न माने ' 'कुंकू' ( मराठी ) या बालविवाहाची समस्या मांडणाऱ्या सामाजिक चित्रपटाने. या चित्रपटात त्यांनी वृद्धत्वाकडे

झुकलेल्या प्रौढ नायकाने आपल्या तरुण पत्नीच्या कुंकवाचा आपण दुबळा आधार आहोत याची जाणीव झाल्यानंतर तिचा दुसरा विवाह करून देण्याचे धाडस दाखविले आणि या त्यांच्या क्रांतिकारी विचारांनी भारतीय संस्कार व परंपरांना धक्का दिला. त्यामुळे शांताराम हे सनातनवादी विचारधारणा असलेल्या भारतीयांच्या टीकांचे लक्ष्य बनले. त्यांचे क्रांतिकारक मत त्यांनी या चित्रपटाद्वारे साकारले; परंतु त्यांच्या संपूर्ण हयातीत अशी क्रांतिकारक सामाजिक घटना त्यांना पहावयास प्रत्यक्षात मिळाली नाही याचीच त्यांना खंत वाटे आणि ही खंतसुद्धा त्यांच्या समाजपरिवर्तनाच्या कळकळीची निदर्शकच आहे. विज्ञानाच्या आपण किती जरी गप्पा मारत असलो, स्वत:ला कितीही विज्ञाननिष्ठ समजत असलो तरी आपल्या अंतरंगातील सनातनी आचार–विचार, संस्कार यांना आपण तिलांजली देऊ शकत नाही त्यामुळे एकट्या व्ही. शांताराम यांचे क्रांतिकारी चित्रपट समाजप्रबोधन करण्यास अपुरे पडतात हे यातून सिद्ध झाले.

तरी १९३९ मध्ये त्यांनी वेश्यांच्या जीवनाचे चित्रण करणारा 'आदमी' ( ' माणूस '–मराठी ) हा सामाजिक चित्रपट काढला. हा चित्रपट निर्माण झाल्यानंतर शांताराम यांच्यातील आणखी एक वेगळे–पण सिद्ध झाले, ते असे की, त्यांच्या नायिकेच्या भूमिका या वास्तवतेला धरून असतात. आणि आपला अभिनय ते कधीही नायक–नायिकेवर लादत नाहीत. तसेच सध्याच्या चित्रपटांप्रमाणे त्यांनी कधीही नायिकेला ओढून–ताणून निष्कलंक दाखविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळेच त्यांच्या नायिका या जमिनीवर वावरणाऱ्या होत्या असे म्हटले जाते. त्याचबरोबर शांतारामही, जे कडवट सत्य आहे, ज्याला कधी ना कधी सामोरे जावेच लागणार ते सत्य रंगविण्यास डगमगले नाहीत म्हणूनच आजही समाजात त्याचं असं एक वेगळं स्थान आहे.

त्यानंतर त्यांनी १९५० मध्ये 'दहेज' हा सामाजिक चित्रपट निर्माण केला. या चित्रपटाद्वारे त्यांनी आता अस्तित्वात असलेली हुंड्याची सामाजिक समस्या ४० वर्षांपूर्वी इतक्या बारकाईने दाखविली की त्यांच्यातील क्रांतिकारक विचार हा आपल्यापेक्षा किती वर्षांनी पुढे होता याची कल्पना येते. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर बिहार सरकारने या सामाजिक समस्येचे परिणाम लक्षात घेऊन व्ही. शांताराम यांच्या दूरदृष्टेपणाचा पुरस्कार म्हणून विधानसभेत 'हुंडा-विरोधी बिल ' पास केले आणि व्ही. शांताराम यांच्या दृष्टीने 'दादासाहेब फाळके' पुरस्कारापेक्षाही हे बिलच त्यांचा एक सर्वोच्च पुरस्कार होता. कारण यामुळे त्यांच्या क्रांतिकारी विचारांना राजकीय बळ प्राप्त झाले. शिवाय समाजाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे स्त्रिया, की ज्यांच्या मनाची पकडसुद्धा शांतारामांच्या क्रांतिकारी विचारांनी घेतली. त्यामुळे या चित्रपटास व्ही. शांताराम यांच्या प्रायोगिक चित्र–कारकीर्दीत अनन्यसाधारण महत्त्व आहे.

हिंदी प्रमाणेच मराठी भाषेतही व्ही. शांताराम यांनी 'अमरभूपाळी', 'पिंजरा' व 'झुंज' हे प्रायोगिक चित्रपट निर्माण केले. 'अमरभूपाळी' मध्ये त्यांनी एका गवळ्याच्या पोराला महान गायकाच्या प्रतिमेत दाखविले. ज्या समाजातील उच्चवर्णीयांना कनिष्ठ दर्जाच्या लोकांच्यामध्ये असलेल्या कला–गुणांचा गौरव करण्याची रीतच माहीत नाही किंबहुना अशी गोष्ट त्यांच्या प्रतिष्ठेस बाधा आणते शिवाय एका कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तीने त्यांची बरोबरी करणे म्हणजे तो एक आपला अपमान आहे असे ते समजतात अशा समाजात 'अमरभूपाळी' म्हणजे आव्हान होते की जे शांतारामांनाच पेलवणारे होते. यानंतरच्या त्यांच्या ' पिंजरा ' या मराठीतील पहिल्या ' राष्ट्रपतीपदक ' विजेत्या रुपक–चित्रामध्ये त्यांनी आदर्शांची जपणूक करणाऱ्याला किती समस्यांना तोंड द्यावे लागते व त्याचेच आदर्श त्यालाच पायदळी तुडवावयास लावणाऱ्यांची संख्या आपल्या समाजात कमी नाही हे दाखविण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर एक तमासगीर स्त्रीही किती उच्चदर्जाचे खोल व मृत्यूलाही न घाबरणारे असे प्रेम करू शकते हे चित्रित केले आहे. तर 'झुंज' या चित्रपटात 'अस्पृश्यांनी अन्याय सहन न करता आपले हक्क उच्चवर्णीयांच्याकडून हिसकावून घेतले पाहिजेत'. अशी शिकवण शांतारामांनी दिली की जिची गरज आजही समाजाला आहे.

अशा या त्यांच्या सामाजिक चित्र–प्रवासास जरी व्यावसायिक यश मिळाले नाही तरी त्यांच्या समाज–क्रांतिकारी विचारधारणेत बदल झाला नाही आणि हेच एक शांतारामबापूंचे मोठेपण होते की ज्यामुळे भारतीय चित्रपटसृष्टीस त्यांच्या अढळस्थानावर कोणत्याही इतर दिग्दर्शकाचा हक्क सांगता येणार नाही; परंतु अशा या दुर्मिळ दिग्दर्शकाची किंमत समाजाला लवकर कळली नाही हेच भारतीय सिनेमासृष्टीच मोठं दुर्दैव आहे. ■

(लघुकथा)

# चिरमुऱ्यांच्या चार दाण्यासाठी

**कु. विशाखा बाबासाहेब मोहिते**
द्वितीय वर्ष कला

शालन एक गरीब व सुशील स्त्री. लहानपणापासून घरादाराची जबाबदारी तिच्या अंगावर पडली होती. तिच्या लहानपणीच वडिलांनी संन्यास घेतला होता. भाऊ नसल्याकारणाने छोटचा दोन बहिणी व आईची जबाबदारी तिच्यावर येऊन पडली होती. ती फक्त पाच वर्षांची असताना तिला तिच्या आईबरोबर कामाला जावे लागत असे. काही दिवस तिने असे काम केले व आणखी तीन वर्षांनी तिला तिची स्वतंत्र कामे मिळू लागली. फक्त आठ वर्षांची असताना तिला खेळण्या–ऐवजी काम करावे लागत होते. असेच दिवस निघून गेले. शालू चांगली १३–१४ वर्षांची झाली. वयात आल्या कारणाने आईला फार काळजी वाटत होती. दिसायला सुंदर असलेली शालन अधिकच सुंदर दिसू लागली. त्यातच त्यांच्या पाहुण्यांनी तिला मागणी घातली. पण शालनच्या आईची त्यांना अट मान्य करावी लागली व शालनच्या आईने रामरावांना घरजावई करून घेतले. माणसाच्या जीवनात एक गोष्ट असते ती म्हणजे – सुख कधी लागोपाठ येत नाही तर त्याला दुःखाशी सुद्धा सामना करावयाचा असतो.

लग्न थाटामाटात उरकले; पण काही दिवसातच शालनची आई वारली. शालनला फार दुःख झाले बहिणींची जबाबदारी तिच्यावर येऊन पडली. तिचा नवरा सुद्धा बायकोच्या पैशांवर ऐष करू लागला. त्याला दारूचे वाईट व्यसन लागले. घरात कमावणारे हात दोनच पण खाणारी तोंडे जास्त होती. एक एक पैसा जमवून तिने बहिणींची लग्ने गरिबांबरोबर का होईनात उरकली.

एका गणेशचतुर्थी दिवशी शालनला मुलगा झाला. गणेशचतुर्थीदिवशी झाला म्हणून त्याचे नाव गणेश ठेवण्यात आले. काही दिवस सुखात गेले. नवरा दारू पीत होता. ती त्याला पैसे देत होती. एके दिवशी संध्याकाळच्या वेळी ती घरी परत आली तर तिला दिसलेल्या दृश्यामुळे ती चक्कर येऊन पडली. घरात लोकांची गर्दी झाली होती व तिचा नवरा रक्ताने माखलेल्या कपडयाने तिथे पडला होता व तिचा मुलगा तेथे रडत बसला होता. जेव्हा ती शुद्धीवर आली तेव्हा तिला कळून चुकलं की तिचा नवरा या जगात नव्हता. सकाळी दारू प्यायला म्हणून त्याने पैसे नेले होते. दारू पिऊन येत असताना बाजारपेठेत एका बैलाने त्याला शिंग मारले व रक्तस्राव झाल्याने त्यातच त्याचा अंत झाला. शालन फार दुःखी झाली. ती आपल्या मुलाला जवळ घेऊन एकसारखी रडू लागली. कामालाही फार दिवस गेली नाही. तिच्यात जगण्याची इच्छाच उरली नव्हती; पण आपल्या मुलासाठी जीवन कंठावयाचे. त्याच्या शिवाय आपल्याला जीवनात कोण आहे ? याचा विचार करून ती परत पूर्ववत कामाला लागली. ती आपला मुलगा गणेश याचे फार लाड करत असे. असेच दिवस निघून गेले. वर्षे उलटली. गणेश सात वर्षांचा झाला होता.

या वर्षी गणेशचतुर्थी महिनाअखेरीस होती. शालनजवळ सणासाठी पैसे नव्हते. कारण तिचा पगारच झालेला नव्हता. त्यातच गणेशचतुर्थीच्या आदल्या दिवशी तिच्या मुलाने गाडीवरच्या आईसक्रीम-साठी हट्ट केला पण पैसे काही जवळ नव्हते. पण गणेश ऐकायलाच तयार नव्हता. त्यावेळी शालू चिडली व तिने त्याला खूप मारले. कधीही मार न खाल्लेल्या गणेशला फार वाईट वाटले व तो रडत रडत झोपला. सकाळी उठल्यावर त्या निष्पापाच्या मनात काहीच नव्हते. तो आईला म्हणाला, "आई संध्याकाळी लवकर ये."

शालनला गदगदून आले. तिने त्याला कुशीत घेतले व मनसोक्त रडली व म्हणाली " बाळा, येताना मालकीणबाईंनी काही राहिलेले मोदक दिले तर तुला आणते तोपर्यंत तू इथेच बस. "

आज शालनचे मन कामावर नव्हते. ती एकसारखी आपल्या हाताकडे पहात होती. त्या हाताने तिने गणेशला मारले होते. इकडे गणेश झोपडीबाहेर बसला होता. त्याच्यापेक्षा मोठी शेजारची मुले होती ती गणपतीच्या मिरवणुकीत जात होती. खोबरे, चिरमुरे उचलून आणत होती. सकाळपासून पोटात काही नसलेल्या गणेशला सुद्धा आपण ते खोबरे व चिरमुरे आणावयास जावे असे वाटत होते. लोक बेभान होऊन नाचत होते. तेथे लेझीम, बँड, ट्रक्स, ट्रॅक्टर्स होते. गणपतीची मोठ्या जोषात मिरवणूक चालली होती.

संध्याकाळी शालनने मालकीणबाईकडून राहिलेले मोदक मागून ताट भरून आणले होते. त्या आनंदातच ती घरी येत होती. तिला गणेशचा सुकलेला चेहरा दिसत होता आणि त्यामुळेच तिचे पाय भरभर पडत होते. ती ज्यावेळी दाराजवळ आली त्यावेळी सर्वजण तिच्याकडे पाहून " चुक् ऽऽ चुक् " असे उच्चार करत होते. तिला काहीच कळत नव्हतं. इतक्यात पोलीस तिच्या जवळ आले. त्यांच्या पाठीमागून एक हवालदार हातातून पांढऱ्या कापडात झाकलेले काहीतरी घेऊन येत होता. तिला काहीच समजत नव्हते. तिची नजर कावरी बावरी झाली. तिची नजर त्या गर्दीत गणेशला शोधत होती. इतक्यात तो इन्स्पेक्टर म्हणाला, " बाई हा मुलगा तुमचा आहे का ?" तिने ते कापड उघडून बघितले आणि तिला मोठा मानसिक धक्का बसला. चिरमुरे व खोबरे आणण्यासाठी गेलेल्या गणेशचा ट्रक–खाली चिरडून अंत झाला होता.

मानसिक धक्क्याच्या कारणाने शालन अतिशय दु:खी झाली होती. तिच्या आयुष्यात अंधाराशिवाय आता काहीच उरले नव्हते.

---

## ॥ राजर्षि छ. शाहू महाराज गौरवांजली ॥

' महाराष्ट्राच्या राजाच्या गळ्यात कवड्यांची माळ ' असे म्हणतात. मला ती माळ फार सूचक वाटते. लोकांचा राजा म्हणून ज्याला जगायचे असते त्याने स्वत:चे जीवन कवडीमोल मानायची तयारी ठेवावी लागते उपभोगशून्य स्वामी ह्यासारखी सत्ताधीशाला सुंदर बिरूदावली नाही. शाहू महाराजांना ती लाभलेली होती.

– श्री. पु. ल. देशपांडे

# म. फुले यांचा समता विचार

**कु. राजनंदा देशमुख**
द्वितीय वर्ष कला

समाजाच्या चरणावर स्वतःला सर्वस्वी वाहून समाजाचे शिव्याशाप खात त्याच समाजाचे भले करायला धावणारा महाराष्ट्राचा पहिला कर्ता पुरुषोत्तम म्हणून कुणास म्हणावयाचे असेल तर ते जोतिराव गोविंद फुले यांनाच ! परमेश्वरी साक्षात्कार किंवा अध्यात्माची कसलीही रुपेरी किनार या माणसाच्या जीवितकार्यास अथवा ध्येयास नसताना आपल्या तिखट परंतु तळमळीच्या बोलांनी या व्यक्तीने सगळ्या महाराष्ट्राला खडबडून जागे केले. आणि त्यामुळेच आयुष्यभर निंदा–टीका यांचेच धनी व्हावे लागलेल्या त्या विभूतीस शेवटी समाजानेच "महात्मा" या पदाने सन्मानित केले.

आपल्या समाजासाठी, विशेषत: समाजातील दीनदुबळ्या लोकांच्या उद्धारासाठी, कार्य करीत राहण्याचा जोतिबांचा निश्चय प्रारंभीच दृढ झाला आणि आपले संपूर्ण जीवन त्यांनी लोकसेवेला वाहून घेतले. 'महाराष्ट्रातील बहुजन समाजाला, पददलित जनतेला आणि शूद्रातिशूद्रांना हजारो वर्षांच्या गाढ निद्रेतून जागे करून त्यांना आपल्या न्याय व हक्कांची जाणीव करून देणारा आणि त्यांचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत अविरत झगडणारा महामानव महात्मा जोतिबा फुले हाच होय.

इंग्रजी राजवटीने भारतीय शूद्रातिशूद्रांना भटशाहीच्या तुरुंगातून सोडवण्याच्या कामी आधीच्या कोणत्याही राज्यकर्त्यांपेक्षा अधिक मजल मारली असल्याचे कृतज्ञतापूर्वक नमूद करून जोतिराव पुढे म्हणतात की, "या देशात इंग्रज सरकार आल्यामुळे शूद्रादि, अतिशूद्र लोक भटांच्या कायिक दास्यत्वातून मुक्त झाले खरे; परंतु आम्हास सांगण्यास मोठे दुःख वाटते की अद्यापि आमचे दयाळू सरकारचे शूद्रादि अतिशूद्रांस विद्या देण्याविषयी दुर्लक्ष असल्यामुळे ते अज्ञानी राहून भट लोकांच्या बनावट ग्रंथांच्या संबंधाने त्यांचे मानसिक दास झालेले आहेत व त्यास सरकार-जवळ दाद मागण्याचे त्राण राहिलेले नाही." शिक्षण मिळाले तरच जनसामान्यांची मानसिक दास्यातून मुक्तता होऊ शकेल. आर्यभटांनी ज्ञानबंदीद्वारे भरभक्कम केलेल्या विषमतांच्या भिंतींना सुरुंग लागून भगदाडे पडतील आणि समताधिष्ठित समाजाचे स्वप्न साकार होऊ शकेल हा जोतिरावांचा आशावाद त्यांच्या काळाशी एकंदरीत सुसंगतच होता.

विद्येची महती समाजाला समजावून देताना जोतिबा फुले म्हणतात–

**विद्येविना मती गेली; मतीविना नीती गेली;**
**नीतीविना गती गेली; गतीविना वित्त गेले;**
**वित्ताविना शूद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले!**

सुदृढ राज्यपद्धतीच्या निर्मितीसाठी त्यांना हे अत्यावश्यक वाटते की, समाजाचा कोणताही घटक शिक्षणापासून वंचित राहता कामा नये ते म्हणतात, "शूद्र शेतकऱ्यांचे मुलांस विद्वान करण्याकरिता त्यांच्या जातीतील स्वत: पाभरी, कोळपी व नांगर हाकून दाखविणारे शिक्षक तयार करून त्यांच्या शाळेत शेतकऱ्यांनी आपली मुले पाठविण्याविषयी कायदा करून, प्रथम काही वर्षे त्यांच्या परीक्षा घेण्याकरिता हलक्या इयत्ता करून, त्यांस ब्राह्मणांच्या मुलांसारख्या पदव्या देण्याची लालूच दाखवून, त्यांच्या मुलामुलींच्या लग्नात लग्नविधी करण्याविषयी परजातीने जुलूम करू नये म्हणून बंदोबस्त केल्याशिवाय शूद्र शेतकऱ्यात विद्या शिकण्याची गोडी उत्पन्न होत नाही." त्यांनी असा आग्रह धरला होता की प्राथमिक शिक्षण वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत सक्तीचे करावे. जनसामान्यांच्या जीवनाशी जुळणारे अभ्यासक्रम तयार करावेत आणि ते त्यांना आस्थेवाईकपणे शिकवणारा, त्यांच्यात मिळून मिसळून वागणारा आणि त्यांच्या गरजा व अपेक्षा अचूकपणे ओळखू शकणारा असा अध्यापकवृंद प्रशिक्षित केला जावा. अभ्यासक्रमात इतर विषयांबरोबरच शेतीचे

व आरोग्यविषयक उपायांचे प्राथमिक ज्ञानही अंतर्भूत करावे.

इंग्रजी विद्वान सत्पुरुषांनी आर्यांच्या कृत्रिम धर्मग्रंथांचा व संहितांचा भंडाफोड केला आणि त्यांची इंग्रजी भाषांतरे करून ती जगात सर्वत्रांस उपलब्ध करून दिली. याबद्दल जोतिराव कृतज्ञता व्यक्त करतात. कारण त्यामुळे वेदबंदीमुळे गुलदस्तांत राहिलेले ब्रह्म–कपट उघडचावर येऊन शूद्राचे डोळे उघडले, हे त्यांनी अनुभवलेही. राज्यकर्त्यांनी आता येथेच न थांबता ब्राह्मणांनी शूद्रांभोवती सापाच्या विळख्याप्रमाणे जे गुलामगिरीचे पाश हजारो वर्षांपासून आवळले आहेत त्यातून शूद्रांची सुटका करण्यासाडी त्यांनी अधिक काहीतरी भावात्मक कार्य करावे अशी अपेक्षा जोतिरावांनी व्यक्त केली आहे.

स्त्रियांची स्थिती सुधारावयाची असल्यास त्यांना ज्ञानाचे दरवाजे खुले करून देणे आवश्यक आहे हे ओळखून त्यांनी स्त्री–शिक्षणाचे कार्य हाती घेतले. १८४८ मध्ये त्यांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. त्यानंतर १८५२ मध्ये अस्पृश्यांसाठीही एक शाळा काढली. आपल्या पत्नी सावित्रीबाई यांना स्वत: घरी शिक्षण देऊन त्यांची शिक्षिका म्हणून शाळेत नेमणूक केली. या कार्यामुळे पुण्यातील सनातनी ब्राह्मण मंडळी त्यांच्यावर संतापली. त्यांनी विरोध करून जोतिबांवर मारेकरी घातले तरी ते डगमगले नाहीत.

सर्वांना शिक्षण मिळण्यासाठी सार्वजनिक शिक्षणाच्या प्रश्नाबाबत सरकारकडे आग्रह धरला होता. बहुजन समाजाला शिक्षण मिळाल्याशिवाय त्याची प्रगती होऊ शकणार नाही असे: त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले. शिक्षणविषयक प्रश्नासंबंधी १८८२ मध्ये सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला होता. त्या आयोगापुढे साक्ष देताना जोतिरावांनी सांगितले की, सरकार गरीब शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करते. त्या वसुलीचे उत्पन्न वरिष्ठ वर्गाच्या शिक्षणावरच खर्च होते आणि वरिष्ठ वर्ग फक्त स्नत:पुरताच विचार करतो. म्हणून सरकारने कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. प्राथमिक शाळांची संख्या वाढवली पाहिजे. शेतकऱ्यांकडून घेण्यात येणाऱ्या शेतसाऱ्यापैकी अर्धा भाग हा प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा अशी मागणी त्यांनी केली होती.

अस्पृश्यांना हिंदू धर्मातील उच्च वर्णियांनी साधे माणुसकीचे हक्क नाकारले होते. शास्त्राप्रमाणे शूद्रांना विद्येचा अधिकार नाही असे उच्च वर्णियांचे मत होते. त्यामुळे अनेक वर्षांपासून हा समाज अज्ञान अंध:कारात खितपत पडला होता. अस्पृश्य उद्धारासाठी त्यांना हक्क मिळवून देण्यासाठी प्रथम शिक्षण देऊन अज्ञान दूर केले पाहिजे याची जाणीव त्यांना झाली. म्हणून शिक्षणाचे कार्य त्यांनी हाती घेतले. अतिशूद्रांची शाळा स्थापन करण्यास त्यांनीं जे नीतिधैर्य प्रकट केले त्याला तत्कालीन महाराष्ट्राच्या इतिहासात तोड नाही.

शूद्र–अतिशूद्र, कनिष्ट वर्गाच्या शोषणास व गुलामगिरीस कारणीभूत ठरलेल्या सामाजिक विषमतेचे मूळ कशात आहे याचा शोध घेऊन त्यांनी ब्राह्मणी वर्चस्वातूनच समाजात पराकोटीची विषमता निर्माण झाली हा निष्कर्ष काढला. ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध चळवळ सुरू करण्याची गरज असल्याचे त्यांचे मत होते. त्यासाठी २४ सप्टेंबर, १८७३ रोजी पुणे येथे बहुजन समाजाच्या ' सत्यशोधक समाजाची ' स्थापना केली. या सत्यशोधक समाजाची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे शूद्र, अतिशूद्रांची ब्राह्मण पुरोहितांकडून होणारी पिळवणूक थांबवणे, अतिशूद्रांना मानवी हक्कांची जाणीव करून देणे, ब्राह्मणांच्या धार्मिक व मानसिक गुलामगिरीतून मुक्तता करणे इ. होते. सर्व जातींचे सभासद यात सामील होते. सत्यशोधक समाजाद्वारे उभारलेला लढा सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक गुलामगिरीविरुद्धचा होता. कनिष्ठ वर्गाचा उद्धार करणे हा त्याचा मुख्य उद्देश होता. आधुनिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक ससाज होय. बहुजन समाजाला बोलके करण्याचे कार्य सत्यशोधक समाजाने केले.

रूसोने म्हटल्याप्रमाणे, 'प्रत्येकाला सत्ता व संपत्ती हुबेहूब सारख्याच प्रमाणात मिळावी असा समतेचा अर्थ आपण घेऊ नये, तर कोणताही नागरिक, इतर नागरिकाला खरेदी करू शकेल इतपत श्रीमंत किंवा स्वत:ला विकणे भाग पडण्याइतपत गरीब असता कामा नये हा समतेचा खरा अर्थ आहे. '

व्यक्तीची योग्यता हा निकष महत्त्वाचा ठरवून समान योग्यतेच्या व्यक्तींना समान वागणूक देणे म्हणजे समता असा समतेचा अर्थ मान्यता पावला.

जोतिराव फुले यांनी आपल्या लेखनातून इथल्या विषम समाजव्यवस्थेची उपपत्ती सांगून तिची तर्कदुष्टता स्पष्ट केली आहे. माणसाचे माणूस म्हणून असलेले हक्क

कोणीही, कधीही व कुठेही नाकारू शकत नाही ही भूमिका त्यांनी मांडली. विषय समाजव्यवस्थेच्या व श्रमविभागणीच्या मुळाशी असलेल्या निहित हितसंबंधावर प्रकाश टाकला. जातिभेदनिराकरण, अस्पृश्यता–निवारण आणि स्त्री–पुरुष समतेचा साक्षेपी पाठपुरावा केला. शिक्षण, प्रबोधन, कायदा, व्यवसायमुक्ती, संघर्ष, सत्यधर्माचरण अशा मार्गांचा समताधिष्ठित समाजाच्या प्रतिष्ठापनेसाठी कसा वापर करता येईल याचा सूक्ष्म विचार केला. शोषणपर समाजरचना ज्या ब्राह्मणी व वर्णश्रेष्ठत्ववादी विचारप्रणालीवर आधारित होती तिची पर्यायी समतावादी विचारप्रणालीची मांडणी केली.कपट कारस्थानपूर्वक इथली विषमता टिकवणाऱ्या भूदेवांना जसे त्यांनी धारेवर धरले तसेच शूद्रातिशूद्रांमधील ज्या कोणाला वर्णश्रेष्ठत्वाच्या अहंगंडाने पछाडले होते त्यांचीही भंबेरी उडवली. या सर्व कारणांनी जोतिराव हे त्यांच्या काळातील श्रेष्ठ समतावाद्यांपैकी अग्रगण्य ठरतात.

सर्व मानवमात्राच्या निर्मिकाने माणसांच्या मुक्त वापरासाठी फळा–फुलांनी लदबदलेली पृथ्वी निर्माण केली, नद्या–पर्जन्याची सोय केली, सूर्य–चंद्रांना निर्माण केले. सर्वांच्या श्वसनासाठी शुद्ध प्राणवायू प्रसृत केला, सर्व माणसांना सारखीच पंचेंद्रिये व विचारशक्ती दिली हे सारे स्मरून माणसांनी आपल्या निर्मिकाशी त्याबद्दल कृतज्ञ रहावे आणि परस्परांशी श्रेष्ठकनिष्ठतेचे तर्कट न वाढवता समानतापूर्वक बंधूभाव आचरावा. जातींचे वा धर्मांचे जे भेद माणसात आहेत त्यामुळे त्यांच्यात तटबंद्या निर्माण होता कामा नयेत.

समता हा निर्मिकाला सर्वात आवडणारा सद्‌गुण असून त्याची जोपासना मानवमात्रांनी करावी असे सांगताना प्रचलित विषम धर्माचरणाच्या जागी समदृष्टी धर्माचरणाची शिफारस जोतिरावांनी केली. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करिता सर्वांना अन्नदान केल्यास तेच निर्मिकाला पावते असे त्याचे सांगणे होते. "स्वतःस सुख होण्याकरिता एकंदर सर्व मानवी प्राण्यास कायिक व मानसिक पीडा दिली नाही म्हणजे त्यासच पुण्य म्हणावे " अशी पुण्याची समतावादी व्याख्याही त्यांनी केली होती.

सर्व प्रस्थापित धर्मांपेक्षा निराळा, बुद्धिप्रामाण्यवादी, इहवादी व नीतिप्रधान सत्यधर्म जोतिरावांनी सांगितला आहे. समता हे सत्यधर्माचे पायाभूत मूल्य आहे. त्यांच्या शिकवणुकीत सर्वधर्म समभाव, परधर्मसहिष्णुता, सामर्थ्य व योग्यता यांच्यानुसार पदे, मानवी हक्कांची हमी, भूतदया, औदार्य, अव्यभिचार, पिढीजात श्रेष्ठकनिष्ठत्वास फाटा, दासप्रथेच्या वहिवाटीचा निषेध, निःपक्षपातीपणा, समदृष्टि, श्रमसन्मान, उच्चनीचतेस फाटा इ. समतापोषक नियमांचा अंतर्भाव सत्यवर्तन करू इच्छिणाऱ्यांसाठी जोतिरावांनी केला आहे.

त्यांनी स्त्री–मुक्तीचा प्रश्न हा सुटा प्रश्न म्हणून कधी मानलाच नाही. एकूण हिंदू संस्कृतीचा व विषमताधिष्ठित उतरंडवजा समाजरचनेचा एक भाग म्हणूनच त्यांनी स्त्रियांच्या गुलामगिरीचा विचार केला होता. संपूर्ण सामाजिक संरचना क्रांतिकारकरीत्या बदलण्याखेरीज स्त्रियांची बंधमुक्तता होण्याची मुळीच शक्यता त्यांना दिसत नव्हती. स्त्री–पुरुष समतेसाठी सामाजिक पर्यावरण बदलण्याइतकाच भर त्यांनी कुटुंबसंस्थेची अधिसत्तावादी संरचना मोडण्यावरही भर दिला होता.

बालविवाहातून अनेक अरिष्टांची मालिका निर्माण होत असल्यामुळे जोतिरावांचा त्यास विरोध होता. आपल्या लेखन व वाचनाद्वारे त्यांनी पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. जोतिराव म्हणतात– " स्त्री पुनर्विवाह करण्याची बंदी ।। अन्यायाची धुंदी ।। थांग नाही ।। स्वतः "बहु स्त्रियांचा पती" होण्यात धन्यता मानणारा पुरुष "स्त्रीस का उलटी रीती" लागू करतो ? त्यांना का बहुपतिक होऊ देत नाही, असा सवालही त्यांनी विचारला होता. जोतिरावांनी जी सत्यशोधक विवाहपद्धती सांगितली आहे तीच मुळी स्त्री–पुरुष यांच्यातील समतेवर आधारलेली असून स्त्रीला स्वतंत्र व स्वायत व्यक्तीचा दर्जा देणारी अशी आहे. स्त्री–पुरुष समतेचा पुरस्कार त्या काळात इतक्या मूलगामी युक्तीवादांच्या आधारे व सातत्य राखून करणारे जोतिराव स्त्रीमुक्तीचे आद्य कैवारी ठरतात.

महात्मा फुले बोलघेवडे समाजसुधारक नव्हते. आपली उक्ती आणि कृती यात त्यांनी कधी विसंगती निर्माण होऊ दिली नाही. त्यांनी जे विचार समाजापुढे मांडले ते स्वतः प्रथम कृतीत आणले. ते खऱ्या अर्थाने कृतिशूर होते. ते केवळ समाजसुधारक नव्हते तर मूलगामी समाजक्रांतिकारक होते. महात्मा फुल्यांच्या कार्याचे खरे मर्म हे आहे की, त्यांनी महाराष्ट्रातील बहुजनसमाजात वैचारिक जागृती घडवून आणली आणि त्यास कार्यप्रवण बनविले.

महात्मा फुले यांच्या कार्याचे वर्णन करताना श्री. धनंजय कीर म्हणतात, ' जोतिरावांचे नाव जोती, आणि जोती म्हणजे ज्योत. त्या जोतीने सामाजिक समता, मानवता आणि विवेकवाद ह्यावर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखविला. त्यांचे उपनाव होते फुले. फुले म्हणजे फुलांचा धंदा करणारे फूलमाळी. त्या माळ्याने राष्ट्ररूपी बागेतील सामाजिक एकतेच्या वाढीस विरोध करणारी तणे नि बांडगुळे उपटून फुलझाडांची उत्तम जोपासना केली. त्यांची सुवासिक सुमने मानवांना उपयुक्त ठरावी हाच त्यांचा उद्देश होता. त्या बागेतील फुलझाडे वाढतच आहेत. त्यांना अद्याप फुलांचा बहर आलेला नाही. जी काही फुले फुलली आहेत त्यापासून मानवतावादाचा सुगंध दरवळत आहे. ज्याप्रमाणे जातिवंत गायनात स्वाभाविक माधुरी संचरत असते, त्याचप्रमाणे त्या बागेतही स्वाभाविकपणे सुगंध दरवळत असतो. '

■

## ॥ राजर्षि छ. शाहू महाराज गौरवांजली ॥

महाराजांच्या जीवनाचे अनेक पैलू आहेत. व्यायामाचे भोक्ते, धाडसी शिकारी, थोर प्रशासक, शिक्षणाचे चाहते, नागरी जीवनाचे सुधारक, कारखाने व व्यापर यांचे पुरस्कर्ते, कलांचे आश्रयदाते इत्यादी, तथापि अनेक वैशिष्ट्यांचा समावेश होऊ शकेल अशा तीन महत्त्वाच्या प्रतिमा आपणापुढे सामान्यतः येतात. पहिली प्रतिमा एक मराठा संस्थानिक ही, दुसरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गादीचे वारसदार ही आणि तिसरी सामाजिक समतेची कदर करणारी व त्यासाठी प्रयत्नशील असलेली थोर व्यक्ती ही.

– श्री. गोवर्धन पारीख

## ॥ राजर्षि छ. शाहू महाराज गौरवांजली ॥

आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाला ज्यांचे कर्तृत्व प्रामुख्याने कारणीभूत झाले अशा थोर पुरुषांच्या मालिकेत राजर्षि शाहू छत्रपती यांची गणना होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस बहुजन समाजातून नव्याने उदयास आलेल्याा सुशिक्षित वर्गांच्या आशा आकांक्षा त्यांच्या कार्यातून व विचारातून प्रकट झालेल्या आहेत. . . महाराजांची भूमिका ही तत्त्वचिंतकाची नसून कृतिशील समाजसुधारकाची होती.

– प्रा. गं. बा. सरदार

# पुरे झाले हे धार्मिक उत्सव

कु. अपर्णा पाध्ये
द्वितीय वर्ष कला

भारतीय जनतेला आपल्या संस्कृतीशी परिचित करून देण्याच्या उद्देशाने आणि लोकांमध्ये एकता निर्माण करण्याच्या हेतूने लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणपती उत्सवाची परंपरा सुरू केली. त्या काळी त्यांना खूप चांगला प्रतिसाद मिळाला. त्यावेळी या उत्सवात सर्वधर्मीयांचे लोक सामील होत असत. या उत्सवात अनेक व्याख्याने ठेवली जात आणि लोकांना त्यातून शिक्षण दिले जाई. त्यामुळे लोकांच्या मनात देशप्रेमाची, समाजसुधारणेची भावना जागृत होत होती.

आजकाल एखाद्या दिवशी वर्गणी गोळा करणाऱ्या युवकांच्या समूहाने आपल्याला गणेश आगमनाची आठवण येते. श्रावण महिन्याच्या अखेरीपासूनच अशा युवकांच्या टोळ्या सगळीकडे जाऊन पैसे गोळा करतात. हे युवक लोकांवर पैशासाठी दबाव आणतात ते सांगतात की, ह्या उत्सवासाठी अमूक इतके रुपये निश्चित केले गेले आहेत आणि ते तुम्हाला दिलेच पाहिजेत. मग तुमची आर्थिक परिस्थिती चांगली असो वा नसो. एखादया शेजाऱ्याने इतके रुपये दिले, मी त्याच्यापेक्षा जास्त देणार या भावनेतून आपण वर्गणी देऊन टाकतो. हा फार मोठा जुलूम दरवर्षी सहन करावा लागतो.

पैसे गोळा झाल्याबरोबर या मंडळाचे एक मुख्य काम असते, ते म्हणजे मूर्तीची ऑर्डर! परंतु या बाबतीतसुद्धा ती मंडळे खूप सावध असतात. मंडळाचे सदस्य इतर मंडळांची मूर्ती, मूर्तीचा रंग, प्रकार, उंची या सगळ्याच्या विषयी चोरून माहिती मिळवतात. गेल्या वर्षीची आपली मूर्ती आणि या वर्षी असणारी मूर्ती ह्याचा विचार करतात आणि नंतरच मूर्तीची ऑर्डर देतात. यामध्ये ते आणखी एका गोष्टीबद्दल सावधानता बाळगतात की, त्यांची मूर्ती लोकांचे लक्ष आकर्षून घेईल. यामध्ये त्यांचा धंदेवाईक दृष्टीकोन असतो.

कितीतरी मूर्तींमध्ये गणपतीला क्रिकेट अगर फुटबॉल खेळताना दर्शवतात. खरोखरच या मूर्ती इतर मूर्तींपेक्षा वेगळ्या असतात परंतु त्या खरोखर देवाच्या रूपात समोर येतात का? लहान मुले देखील असे म्हणतात की, हा गणपती नाही, हा क्रिकेटप्लेअर आहे. जेंव्हा नारळ, बिस्कीटस्, गोट्या, नाणी किंवा कोणत्याही अन्य पदार्थाने जेव्हा गणपतीची मूर्ती बनवतात तेव्हा मूर्तिकारांना जास्त पैसे मिळतात; परंतु त्या मूर्तीचे फोटो विकण्याचा धंदा मंडळाचे सदस्य करतात आणि उत्सवाला बाजारी स्वरूप येते.

मंडळाचे गणपती जेव्हा आणले जातात तेव्हा गणपतीसमोर जे काही चालते ते बघण्यासारखे असते. मूर्तीसमोर अंगविक्षेप करून नाचतात, मूर्तीसमोर सिनेमा किंवा नाटकांमधील धुंदफुंद गाणी गातात, रेकॉर्डप्लेअर लावतात, फटाके वाजवतात. परंतु फटाके, त्यांचा धूर, गाण्यांचा आवाज यामुळे अनेक प्रदूषणे होतात. फटाके वाजवल्याने व गाण्यामुळे ध्वनिप्रदूषण, फटाक्यांमुळे व मूर्तीपुढे जो रंग फेकला जातो त्यामुळे वायूप्रदूषण होते. रंगांमुळे डोळ्यांचे आणि शारीरिक नुकसान होते. मूर्तीपुढे असे काही अंगविक्षेप केले जातात की त्यामुळे देवाला देखील वाटेते की इथून पळून जावे. एकूण सारा बीभत्स, किळसवाणा प्रकार.

जिथे जिथे गणपती बसवला जातो तिथे तिथे लोकांना आकर्षित करण्यासाठी रोशनाई केली जाते, सीन केले जातात, कार्यक्रम असतात. परंतु काही ठिकाणी सिनेमा दाखवले जातात. जी खूप वाईट गोष्ट आहे.रोशनाईसाठी खूप खर्च केला जातो. या रोशनाई. मुळे राष्ट्रीय नुकसान होते. सिनेमा दाखवण्यासाठीसुद्धा खूप खर्च केला जातो. लोक तो आनंदाने पाहतात पण यावर विचार करत नाहीत की, त्यासाठी पैसा त्यांच्या खिशातून काढला जातो. रोशनाई, सीन पहाण्यासाठी लोक आपला किंमती वेळ आणि पैसा खर्च करतात. रात्री नऊ वाजता लोक घरातून बाहेर पडतात आणि रात्र–रात्र हे सर्व पाहण्यात घालवतात. या सर्वांचा

परिणाम त्यांच्या दिवसभराच्या कामावर पडतो आणि कार्यालयांमध्ये योग्यरीतीने काम केले जात नाही.

ज्या दिवशी गणेश मूर्तीचे विसर्जन असते त्या दिवशी रिक्षा, ट्रक, ट्रॅक्टर सकाळपासूनच सजवायला सुरुवात केली जाते. सकाळी अकरा वाजता सर्व मूर्ती एका ठिकाणी एकत्र येतात व तेथूनच शोभायात्रेला सुरुवात होते. ह्यावेळी सुद्धा ती मंडळे शांततेने काम करत नाहीत. कोण पुढे, कोण मागे यातून वाद, दंगा, सुरू होतो. पोलीसांनादेखील त्यामध्ये पडावे लागते. जेव्हा हा झगडा संपतो तेव्हा ही यात्रा पुढे सरकते. ट्रक–ट्रॅक्टर्सना सजवले जाते. रोशनाई केली जाते. सामाजिक प्रश्न घेऊन चित्ररथसुद्धा केले जातात. त्यावर्षी प्रसिद्ध झालेल्या गीतांना परत गाइले जाते. आजकाल प्रत्येक मूर्तीपुढे झांजपथक, लेझीमसुद्धा असते.

या धडाकेबाज गीतांच्या भाऊगर्दीत अशा लोकांच्याविषयी विचार केला जात नाही जे आजारी आहेत. हॉस्पिटलमध्ये अत्यवस्थ असणारे रुग्ण, ज्यांना आरामाची, शांततेची अतिशय गरज असते. परंतु या गणेशउत्सवाच्या नावाखाली चालणाऱ्या गोंधळामुळे त्यांची प्रकृती खालावते. ज्या रस्त्यारून ही मिरवणूक जात असते अशा रस्त्यावरील घरातील वृद्ध लोकांचे हाल पहावयासच नको ! ते हा गोंधळ शकत नाहीत आणि या गोंधळामुळे शांत झोपूही पाहू शकत नाहीत. आज-कालच्या स्पर्धात्मक युगात परीक्षांचे प्रस्थ बोकाळल्यामुळे मुलांना वारंवार परीक्षा द्याव्या लागतात. परंतु सहामाही परीक्षा जेंव्हा जवळ आलेल्या असतात त्याच वेळी गणेश उत्सव असल्याने विद्यार्थ्यांचे फारच नुकसान होते.

हा सारा कार्यक्रम दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत चालतो. ह्याचा देखील परिणाम दुसऱ्या दिवशीच्या कामावर होतो. येथे ज्या प्रकारचे नाच केले जातात म्हणजे डिस्को वगैरे, परंतु वर्षातून एकदाच नाचणाऱ्या लोकांच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीवर परिणाम होतो. अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी गिरणी, कार्यालये यांमध्ये उपस्थिती कमी असते ज्यामुळे राष्ट्रीय नुकसान होते.

काही लोक या गणेशोत्सवाच्या मिरवणुकीचा फायदा घेऊन मिरवणुकीवर दगडफेक करतात व यातून स्वार्थासाठी दंगे घडवून आणतात. फक्त परधर्मीय लोकच असे दंगे घडवून आणतात असे नव्हे तर काही समाजकंटक हिंदूधर्मीय लोकसुद्धा असे दंगे घडवून आणतात हे एकप्रकारचे युद्धच असते, जे जातीय तणाव वाढवण्यास पोषक ठरते. यामुळे सामाजिक ऐक्य धोक्यात येते.

गणेशोत्सव म्हटले की, पोलीस, होमगार्डस, गृहरक्षकदल यांच्या तोंडचे पाणी पळते. कारण त्यांना एकतर रात्रंदिवस ड्यूटी करावी लागते. त्यांना काही वेळेला जेवण–खाण सुद्धा वेळेवर घेता येत नाही. त्यांना या कामाबद्दल मिळणारा मोबदला अत्यल्प असल्याने ते हे काम करावयास नाखूष असतात. पण जर अशा मिरवणुकीच्या वेळी दंगा झाला तर त्यांना आपले प्राणदेखील धोक्यात घालावे लागतात. त्यांना रात्रंदिवस काम करावे लागल्याने त्यांचे शारीरिक नुकसान होते. ही मिरवणूक दंगा न होता पार पाडण्याची जबाबदारी त्यांची असल्याने त्यांच्यावर मानसिक ताण पडतो.

अशा प्रकारे हा उत्सव ज्या हेतूने सुरू केला होता तो हेतू आज मागे पडत चालला आहे. आज गणेशोत्सव म्हणजे वर्गणीतून पैसे गोळा करून खिसे भरणे आणि लोकांना आकर्षित करणे हाच राहिला आहे. हे तर गणेशोत्सवाचे भ्रष्ट रूप आहे.

असे जरी असले तरी यावर काही उपाय आहेत. ज्याप्रमाणे आजकाल काही मंडळे वर्गणीच्या पैशातून गरीब गरजू विद्यार्थ्यांचे फीचे पैसे भरतात, त्यांना कपडे, पुस्तके देतात त्याचप्रमाणे इतरांनाही त्यांच्या पावलावर पाऊल टाकून सार्वजनिक कार्य करता येईल. जर महाराष्ट्रात घरा–घरांतून गणपती बसवतात तर गल्ली–गल्लींतून गणपती बसवण्याची गरजच उरत नाही. परंतु सार्वजनिक गणेशोत्सवासाठी संपूर्ण शहरातून किंवा गावातून एकाच ठिकाणाची निवड करता येईल जेथे गणपतीची प्रतिष्ठापना करावी आणि अशा ठिकाणी इतर काहीही न करता ज्ञानाचे आणि प्रबोधनाचे विचार लोकांपर्यंत पोहोचवणेसाठी व्याख्यान-माला, पोवाडे, उद्बोधक नाटके यांचा प्रभावी वापर करावा, ज्यामुळे अपेक्षित गणेशोत्सव साजरा होईल की, ज्यामधून ऐक्य निर्माण होईल. आणि असे ज्या दिवशी घडून येईल तेव्हाच गणेशोत्सव हवा–हवासा वाटेल. तोपर्यंत नको तो गणेशोत्सव असेच कोणीही सूज्ञ माणूस म्हणेल. ■

# बोनसाय

कु. ज्योती उगळे
द्वितीय वर्ष वाणिज्य

बोनसाय केलेलं ते छोटयाशा कुंडीतील वडाचं रोपटं सगळयांच्या आकर्षणाचं बनलं होतं.खरंच मलाही कौतुक वाटत होतं त्याचं. कुठे तो प्रचंड वटवृक्ष आणि कुठे त्याचं हे बोनसाय केलेलं इवलंसं रूप.मनाशीच तुलना करत होते. आणि अचानक ते रोपटं केविलवाणं भासू लागलं.मनात कुठेतरी खळबळ माजली.वाटलं हा अन्याय आहे. एवढया प्रचंड अस्तित्वाचं रूपांतर एवढयाशा रोपटयात करून त्याचं अस्तित्व पार गोठवून टाकलं आहे अगदी, या समाजात राहणाऱ्या स्त्रियांसारखं.

ते बोनसाय पाहून वाटलं स्त्री तरी त्या रोपटया-पेक्षा कुठे वेगळी आहे ? स्त्रीला तिच्या नकळत तिच्या मनाचं पार कलम करून टाकलं आहे. जिथे जन्म घ्यायचा आहे तिथे राग–लोभात संस्काराचं जसं मिळेल तसं खतपाणी घेऊन आयुष्याच्या शिडीवरच्या पायरीवर पुढे पाऊल टाकायचं अनेकजण येऊन तिच्या सौंदर्य, गुण व संस्काराची परीक्षा घेऊन जातात आणि एखादा रसिक स्वतःच्या चौकटीत या स्त्रीला घेऊन जातो. ही स्त्री त्याच्या मर्जीनुसार, आदेशानुसार स्वतःचं अस्तित्व विसरून त्याही स्थितीत दुसऱ्याला आनंद देण्याचा प्रयत्न करते. कदाचित त्यात ती स्वतःला विसरून जाऊ शकते, कारण तिचं मन त्या बोनसायसारखं बनवलेलं असतं, ते तिनं स्वतःच्या मर्जीनुसार कधीच वाढवलेलं नसतं.

आज या २१ व्या शतकाची वाटचाल करताना स्त्रीला समानतेचा दर्जा मिळाला आहे असे म्हणतात. पण ही जागृतता किती अंशी स्त्रियांच्या वाटयाला आली आहे ? निसर्गाने समाजामध्ये स्त्री–पुरुष ही दोन अस्तित्वं निर्माण केली. दोन्ही अस्तित्वांचं रूपही स्वतंत्र आहे. मग एका अस्तित्वाने दुसऱ्या अस्तित्वाला तू स्वतंत्र आहेस किंवा नाहीस हे सांगण्याचा हक्क कोणी दिला ? पुरुष वैयक्तिकदृष्टया प्रबल मानण्यात आला आणि कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी त्याने स्वीकारली; पण आज स्त्रीनेही कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी ती पार पाडू शकते हे दाखवून दिले आहे. तरीही समाजात स्त्री कुठेतरी कमी पडते म्हणून तिला केवळ कायद्यामध्येच समानता दाखविली गेली आहे ?

परवाच भारताचे सरन्यायाधीश रंगनाथ मिश्रा यांनी स्त्रीविषयी असे मत प्रकट केले की, स्त्रियांनी नोकरी करू नये, त्यांनी आपली चूल आणि मूल सांभाळावे. या न्यायदात्याने कोणत्या भावनेने हे विधान केले कोण जाणे.कदाचित त्यांना हे माहीत नसेल की स्त्रिया स्वतःचे घर विसरून कधी बाहेर पडत नाहीत. त्या स्वतःचे कर्तव्य पालन करतातच किंवा कदाचित त्यांनी घराला स्वकष्टाने आधार देणाऱ्या स्त्रीचे रूप पाहिले नसेल अथवा पतीबरोबर सहचारिणी म्हणून प्रवास करताना आलेल्या धोक्यांना तोंड देणाऱ्या कर्तव्यनिष्ठ आणि स्वाभिमानी स्त्री चे औदार्य पाहिले नसेल.

आज ह्या लोकशाही राज्यामध्ये प्रत्येकाला स्वतःचे आयुष्य स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. तरीही समाजातील पुरुष आपले वर्चस्व दाखवून स्त्रीच्या मनाचे खच्चीकरण करतो आहे. कदाचित त्याला वाटत असेल की स्त्री एकदा घराबाहेर पडली की पुरुषांचे अस्तित्व नाकारून समानतेच्या हक्काचा त्यांच्या सारखेच वर्चस्व दाखविण्यासाठी प्रयत्न करेल; पण आजची स्त्री वर्चस्व दाखविण्यासाठी नाही तर केवळ स्वतःच्या जगण्याला काही अर्थ यावा, जगण्याचा भरभरुन आनंद लुटावा आणि स्वतःमधील कलागुणांचा विकास करून दुसऱ्यांनाही काही शिकवावे एवढयाचसाठी बाहेर पडू पाहते आहे.

काहींच्या मते स्त्रिया नोकरी करू लागल्यापासून समाजात बेकारी वाढली आहे. स्त्रिया केवळ चैनीसाठी नोकरी करतात. पण गरजेसाठीच कष्ट करावे लागतात हे लोक का विसरतात ? आणि स्त्री ने केवळ स्त्री आहे म्हणून चैन करू नये ? जेव्हा पुरुष चैनीला दैनंदिन गरज बनवतात तेंव्हा स्त्रियांनी काय बोलावे ? आज बाहेर पडणारी, नोकरी करणारी स्त्री स्वतःचे घर कुशलतेने सांभाळते आहेच. तिने स्वतःला घराची गरज आहे हे कधीच नाकारलेले नाही याच कारणास्तव ती कुठेतरी कमी पडते असे मानावे का ?

प्रत्येकाने स्वतः जागृत होऊन जीवनाकडे पाहिले पाहिजे. समाजानेही स्त्रीला दुर्बल घटक न मानता, तिच्या मनाचे खच्चीकरण न करता प्रत्येक क्षेत्रात तिचा विकास होवू द्यावा. केवळ सुंदर, नाजूक आणि आकर्षक दिसावा म्हणून एखाद्या सजीवास बोनसाय बनवण हा अन्यायच नाही का ? ■

# लोकशाही व सामाजिक समता

**कु. उषा नामदेवराव पाटील**
द्वितीय वर्ष कला

सामाजिक जीवनाच्या आवश्यकतेतून, अपरिहार्यतेतून ज्या अनेक विचारप्रणाली जे अनेक आचारधर्म अस्तित्वात आले त्यापैकी एक म्हणजे लोकशाही. लोकशाही ही एक राज्यकारभाराची पद्धत आहे. ते एक सामाजिक तत्वज्ञान आहे म्हणून काहीतरी भयंकर, कठीण प्रकार आहे, सर्वसामान्य माणसाच्या समजण्यापलीकडील गोष्ट आहे असे नाही. हे तत्वज्ञान प्रत्येकासाठी आहे आणि प्रत्येकाला समजू शकेल असेही आहे. मात्र ते समजून घेण्याची खरीखुरी प्रामाणिक इच्छा असली पाहिजे. तसे पाहिले तर व्यक्तीला समाजात कितीसे महत्त्व आहे ? तो परावलंबी तरी किती ? एका विचारसरणीचे अनेक लोक भिन्न भूप्रदेशावर राहतात. Socialogy that cannot preside the exact science. सगळ्यांनी चांगले ऐकावे. उत्तम रीतीने जीवन जगण्यास एकत्र यावे, प्रकाशमान संस्कृतीने आपल्याला मदत करावी असा हा समाज असतो. अशा समाजापासून, वस्तीपासून कोणीही अलग राहू शकत नाही. सामाजिक जीवन हे एक महान आणि विलक्षण सत्य आहे. इतरांच्यात, इतरांबरोबर आणि थोडेबहुत इतरांसारखे जगणे अटळ आहे याची जाणीव प्रत्येकाला पूर्णपणे झालेली आहे. अशा या समाजात लोकशाही टिकविणे आवश्यक आहे.

अब्राहम लिंकनची लोकशाहीची व्याख्या अशी की ' Democracy is the government of the people by the people and for the people' सुसंघटित सामाजिक जीवनाची आवश्यकता आणि व्यक्तीस्वातंत्र्याच्या भावनेची तीव्रता ह्या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन बनविलेली एक नियमावली म्हणजे लोकशाही. लोकशाही व सामाजिक समता या दोन्ही संकल्पना परस्परपूरक आहेत म्हणजेच एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत परंतु आपल्याला आपले जीवन स्वतःच्या पद्धतीने जगता आले पाहिजे असेच प्रत्येकाला वाटत असते. या स्वातंत्र्याला मान्यता हा लोकशाहीचा पाया आहे. या लोकशाहीत आपल्यावर जर अन्याय झाला तर आपण त्याच्याविरुद्ध बंड करून उठतो. एकटचा व्यक्तीवर जर अन्याय झाला तर तो ज्वालामुखीप्रमाणे सर्व समाज उद्ध्वस्त करू शकतो. एवढी प्रचंड शक्ती त्याच्यात कुठून आली, तर या अस्तित्वात असलेल्या लोकशाहीमुळेच ना ! आज या लोकशाहीत प्रत्येकाला स्वातंत्र्याचा हक्क आहे आणि तो जर हक्क कोणी हिरावून घेण्याचा प्रयत्न केला तर आपण त्याला प्रतिकार करू शकतो.अशी ही लोकशाही लोकांच्यासाटी लोकांकरिता लोकांनीच बनविलेली आहे. त्यामध्ये समानता आहे, सामाजिक समता आहे. व्यक्तीवर जर अन्याय झाला तर तो न्यायालयात दाद मागू शकतो. न्यायसंस्था ही तर लोकशाहीचे प्रतीक आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला व्यक्तीस्वातंत्र्य असते. याचे उदाहरण म्हणजे इंदिरा गांधी यांच्यावर खटला भरला होता. हा खटला ते का भरू शकले ? एवढचा मोठ्या सत्तेची मालकीण असूनसुद्धा तिच्याविरुद्ध खटला भरला जातो, तिच्याविरुद्ध आरोप केला जातो. हे सर्व कशामुळे साध्य होऊ शकले की एवढी प्रचंड सत्ता हातात असताना त्या सत्तेच्या जोरावर काहीही करू शकत नव्हत्या. एका सत्ताधारी पक्षाच्याविरुद्ध, आरोप करणे किंवा फिर्याद करणे, हे सर्व कशामुळे होऊ शकते, तर आज या समाजात असलेल्या लोकशाहीमुळेच ! परंतु हुकूमशाही, राजेशाहीमध्ये आपल्याला असे आढळून येणार नाही. हुकूमशाहीमध्ये एकच हुकूमशहा असतो. त्याच्या मताप्रमाणे सर्वांनी ऐकावयाचे असते, वागायचे असते नाहीतर त्याला गोळी घातली जाते. राजेशाहीमध्येसुद्धा एकाच राजाच्या आज्ञेचे पालन करावयाचे असते. एखाद्या व्यक्तीवर जर चोरीचा आरोप असला तर ती चोरी कुणी पुरावे, साक्षी याच्यानुसार सिद्ध करून दाखविणार नाही, तर राजा जी शिक्षा करेल ती त्याला भोगलीच पाहिजे. मग त्याने चोरी केलेली असू दे किंवा नसू दे. येथे मात्र आपल्याला प्रतिकार करता येणार नाही. अन्यायाशी झुंज देता येणार नाही. त्यामुळे तेथे लोकशाही नसल्याने

सामाजिक समताही दिसून येणार नाही. प्रत्येक गोष्ट दुसऱ्याच्या हुकूमावर करावी लागते. तेथे त्याच्या मनाचा, त्याच्या भावनांचा विचार केला जाणार नाही. कारण तिथे मुळातच लोकशाही नाही म्हणजे समताही नाही. अशा या राजेशाहीत, हुकूमशाहीत आजचा मनुष्य कितपत टिकेल ? शुद्ध मोकळ्या वाऱ्याच्या झुळकी मिळाल्या नाहीत तर व्यक्ती गुदमरून जाईल. आणि समाजाचाही श्वास कोंडेल म्हणून आम्हाला लोकशाही हवी आहे. विचारस्वातंत्र्याचे, आचार-स्वातंत्र्याचे आश्वासन हवे आहे. आमचे हातपाय बांधले जाणार नाहीत, जीभ धरली जाणार नाही, मन मारले जाणार नाही अशी हमी मिळाली पाहिजे. आज जगाच्या कानाकोपऱ्यातून सर्वांनाच असे तीव्रतेने वाटू लागले आहे.

व्यक्तीचा सर्वांगीण विकास कसा होऊ शकेल ? त्यासाठी समाजप्रबोधन झाले पाहिजे. त्यातून व्यक्ती-प्रबोधन घडू शकेल. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य मिळेल. त्यामुळे समाजात समता प्रस्थापित होईल व लोकशाहीवाढीस चालना मिळून सामाजिक समता वाढीस लागेल. म्हणजेच लोकशाही व समता या परस्परपूरक आहेत.

आज लोकशाहीत लोक आपल्या विश्वासातले आपल्याला लायक वाटणारे प्रतिनिधी निवडतात. हे प्रतिनिधी कधी अडाणी तर कधी अप्रामाणिक निघतात ते सत्तालोलुप, कीर्तीलोलुप आणि धनलोभी होतात. असे लोकप्रतिनिधी हां हां म्हणता लोकशाही संपुष्टात आणू शकतात. लोकशाहीचे अधःपतन होते. अशावेळी जनता जागृत असली पाहिजे. लोकशाहीत प्रत्येकाने डोळ्यात तेल घालून जागे राहिले पाहिजे. आळसामध्ये व काहीही न करता आपला वेळ दवडू नये म्हणूनच म्हटले आहे की,

**काळचोर घिरट्या घाली**
**पामरा तुज कशी निज आली ।**
**जाग जाग स्वरुपी लवलाया**
**जातसे वय अमोलिक वाया ।**

लोकशाहीत प्रत्येक रात्र वैऱ्याची असण्याचा संभव असतो. लोकशाही शासनसंस्था लोकशाहीसाठीच असते हे खरे, पण ती केव्हा लोकविघातक ठरेल हे सांगता येत नाही.म्हणून आज या लोकशाहीत अंधःकार माजू पहात आहे. हा अंधःकार नष्ट करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने झटले पाहिजे. मनापासून श्रम केले पाहिजेत. अंधःकारात जन्म झाला तर उदबत्तीने स्वतःला भाग्यवान समजावे. तसे आजच्या व्यक्तीने लोकशाही-मधला अंधःकार नष्ट करण्यासाठी उदबत्तीप्रमाणे जळले पाहिजे, चंदनाप्रमाणे झिजले पाहिजे. निदान आपण काजवा तरी आहोत काय याचा विचार केला पाहिजे. तरच त्यांच्या कार्याचा लोकशाहीमध्ये सुगंध पसरेल. म्हणजेच लोकशाहीवाढीस चालना मिळून सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत होईल. अशा तऱ्हेने समानतेची, व्यक्तिस्वातंत्र्याची मूल्ये लोकांनी पाळा-वयाची आहेत. बिकट वाटेने डोंगर चढावयाचा आहे. घटना ही काठी आहे. काठीतच पाय अडकून पडण्याची भीती असते. तेवढी सावधगिरी ठेवून काठीच्या आधाराचा आस्तीत जास्त उपयोग करून घेऊन मार्ग आक्रमावयाचा आहे.

लोकशाही म्हणजे एखादी विद्यापीठाची पदवी नव्हे की ती एकदा मिळाली म्हणजे जन्मभर आपोआप टिकावी. पदवी मिळते तेव्हा असलेले ज्ञान हळूहळू विसरत जाते आणि शेवटी नाहीसेच होते. पदवीचे मोरपीस मात्र झळकत राहते. पण लोकशाहीत सरकार जुलमी आहे, कर्तव्यशून्य आहे अशा तऱ्हेची ओरड राहिली तर त्याला अर्थ काय ?

आजच्या लोकशाहीत समाज हा ध्येयवादी पाहिजे. ध्येयवादाचा आदर्श समाजापुढे पाहिजे. तरच ही लोकशाही टिकू शकेल अन्यथा समाजाचे ध्येय नसेल, मन नसेल तर तो समाज मरतो. म्हणून ध्येयवादाचा आदर्श जेव्हा समाजापुढे येतो तेव्हा तो समाज सजीव होतो. तेव्हा एक ध्येयवाद समोर ठेवला पाहिजे वशिष्ठ, छत्रपती शिवाजी महाराज, विश्वामित्र यांच्यात ध्येयवाद होता म्हणून ते उच्चपदावर जाऊन पोहचले. असा जर ध्येयवाद पेटवू शकलो तर जिवंत-पणाची ज्योत पेटविता येईल व लोकशाही व सामाजिक समता उत्तमरीतीने प्रस्थापित करता येईल. लोकशाही-बरोबरच समता ही आपल्याला राखायला हवी. समता म्हणजे तरी काय ? समता म्हणजे काही वारंवार कापल्यामुळे हिरवळीला येणारी फूट नव्हे तर पाण्यावर तरणाऱ्या लहानथोर उर्मींचं एकमेकांशी आत्मीयतेनं समरस होणं होय.

समाज हा स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर, सुसंघटित असावयास हवा. त्यासाठी बुद्धिवादी, श्रमिक या सर्वांची आवश्यकता आहे. यामध्ये उच्चनीतता येतेच कशी ? भारतात आर्थिक विषमता आहे, दारिद्र्य आहे,

सामाजिक विषमता आणि अन्यायही आहेत. इथे वर्गभेद, धर्मभेद, जातिभेद, प्रांतभेद, भाषाभेद असे भेदाभेद आहेत. अशा भेदमय समाजात व्यक्तीची कुचंबणा होत असेल, माणसे अगतिक होत असतील तर हे भेद लोकशाहीस मारक आहेत. आपण जरी वेगवेगळ्या प्रांतात रहात असलो, भिन्न-भिन्न भाषा बोलत असलो, वेगवेगळ्या जाती-जमातींचे असलो तरीसुद्धा आपण सर्वजण एकाच देशाचे नागरिक आहोत, भारतमातेची लेकरे आहोत, ही जाणीव ठेवली तर निश्चितच लोकशाहीच्या मदतीने आपण सामाजिक समता प्रस्थापित करू शकू. आपण दररोज जी प्रतिज्ञा म्हणतो, पुस्तकापुस्तकातून वाचतो की, भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत ही प्रतिज्ञा फक्त ओठातच न ठेवता जर प्रत्यक्ष आचरणात आणली तर आपल्या देशामध्ये लोकशाहीच्या माध्यमातून समता प्रस्थापित होऊ शकेल व व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास, उन्नती होऊ शकेल. म्हणून लोकशाही व सामाजिक समता या गोष्टी भिन्न आहेत असे आपल्याला म्हणता येणार नाही. या गोष्टी परस्परपूरकच आहेत. एकाच रथाची ही दोन चाके आहेत. दोन्ही चाकांच्या मदतीने समाजरूपी रथ भरधाव वेगाने आपण उन्नतीच्या किंवा विजयाच्या मार्गावर पळवू शकलो तर देशाचा उषःकाल होण्यास विलंब लागणार नाही.

जेव्हा व्यक्ती आपले विविध आर्थिक आणि सामाजिक प्रश्न सरकारच्या तोंडाकडे न पाहता आपले आपण सोडविण्याचा चंग बांधेल तेव्हा तिला लोकशाही जीवनाचे व सामाजिक समतेचे रहस्य समजल्याची खूण दिसेल. विशिष्ट संस्थांनी हे प्रश्न हाती घ्यायचे असतात हे आकलन समाजाच्या शांतीच्या आणि स्थैर्याच्या दृष्टीने अतिशय मोलाचे ठरेल. किरकोळ मतभेद लक्षात न घेता कार्यावर नजर ठेऊन एकोप्याने काम करा असे कुणा नेत्याने सांगून त्यांना कार्यप्रवण करणे आणि दहा लोकांनी एकत्रितपणे खरोखरीच झटणे या दोन्ही गोष्टींना लोकशाहीजीवनात विशेष महत्त्व आहे. लोकांमध्ये समजून घेणे, जाणणे, जेव्हा वाढेल, सहिष्णुता संयम आणि विवेक जितका जास्त येईल तितका संघर्ष कमी होत जाईल. सहकार वाढीला लागेल. उत्साह हवा उतावळेपणा नको. निष्ठा हवी, आग्रह नको. संयम हवा, निष्क्रियता नको. निर्भयता हवी, दांडगेपणा नको. अशा होकार नकारात्मक गुणांवर संस्था चालतात. या गुणांवर आज लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे. तसेच सामाजिक समताही अवलंबून आहे. लोकशाही व सामाजिक समता जितक्या चांगल्या जोमाने वाढीस लागतील तितके देशाचे भवितव्य चांगले राहील व देश हा प्रगतीपथावर लवकरात लवकर पोहोचेल. म्हणून लोकशाही व सामाजिक समता यांच्यावर देशाचा विकास अवलंबून आहे. लोकशाही व सामाजिक समता यांचा विकास जेवढ्या जलद गतीने होईल तेवढ्याच गतीने देशाचाही विकास होईल. म्हणजेच लोकशाही व सामाजिक समता हे आपल्या देशाचे दोन पंख आहेत आणि जर या पंखांनी चांगली भरारी मारली तरच देशरूपी पक्षी उच्चपदावर पोहचू शकेल. म्हणून ते दोन पंख मजबूत करण्याचे सामर्थ्य आपल्यात आहे ते आपण एकाग्र मनाने, एकोप्याने केले तरच देशाचा विकास होईल व लोकशाही व समतेचे महत्त्व कळून येईल.

## ।। राजर्षि छत्रपती शाहू महाराज गौरवांजली ।।

आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाला ज्यांचे कर्तृत्व प्रामुख्याने कारणीभूत झाले अशा थोर पुरुषांच्या मालिकेत राजर्षि शाहू छत्रपती यांची गणना होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस बहुजन समाजातून नव्याने उदयास आलेल्या सुशिक्षित वर्गाच्या आशाआकांक्षा त्यांच्या कार्यातून व विचारातून प्रकट झालेल्या आहेत . . . महाराजांची भूमिका ही तत्त्वचिंतकाची नसून कृतिशील समाजसुधारकाची होती.

प्रा. गं. बा. सरदार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दीनिमित्य खास लेख

# भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर

कु. कल्पना खोत
द्वितीय वर्ष साहित्य

नवभारताच्या घटनेचे प्रमुख शिल्पकार, लोकशाहीचे त्राते नि मानवी स्वातंत्र्याचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र हे आधुनिक भारताच्या इतिहासाचे एक सोनेरी पान आहे. स्वतःच्या बुद्धिमत्तेवर विसंबून राहून जो गाढ तपश्चर्येने, अलौकिक धैर्याने नि अखंड उद्योगशीलतेने उच्च ध्येयासाठी अविरत झगडतो तो धुळीतून धुरंधरांच्या मालिकेत जाऊन कसा विराजमान होतो हे सिद्ध करणारे उदाहरण आधुनिक भारतात सामान्य मनुष्यास अन्यत्र सापडणे कठीण आहे.

१४ एप्रिल १८९१ रोजी महू येथे तपोनिष्ठ भीमाबाईंना पुत्ररत्न झाले. त्यांच्या या चौदाव्या रत्नाचे नाव सुभेदारांनी भीम असे ठेवले.

काप–दापोलीस मराठी शाळेत भीमाने शिक्षणाचा श्रीगणेशा केला. त्यानंतर रामजी सुभेदार आपले बिऱ्हाड घेऊन मुंबईस गेले. तेथील काही लोकांच्या ओळखीने त्यांची सातारा येथील सरकारी सार्वजनिक कामाच्या विभागामध्ये कोठावळा म्हणून नेमणूक झाली. साताऱ्यातील लष्करी छावणीत भीमाचे शिक्षण सुरू झाले. सुभेदारांचे भीमावर भारी प्रेम होते. त्यांच्या कडक शिस्तीरूपी खडकामधून वात्सल्याची दूधगंगा दुथडी भरून वाहत असे. रामजी संकपाळ रामायण व महाभारत काव्यातील कथा मुलांना वाचून दाखवीत. तसेच संतवाङमयाचे वाचन, पठण नि विवेचन केल्यामुळे भीमाच्या संस्कारक्षम बालमनावर उत्तम ठसा उमटला होता. त्यामुळे त्याच्या पुढील आयुष्यातील मराठी पाक्षिकाच्या आणि साप्ताहिकाच्या संपादकीय कर्तृत्वाचा पाया हा बालवयातच घातला गेला होता.

**शिक्षणाचा प्रारंभ**

मुलांच्या दैनंदिन उन्नतीकडे रामजी सुभेदार स्वतः लक्ष देत असत. भीमाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होऊन त्याच्या इंग्रजी शिक्षणास आता आरंभ झाला. आपणास शाळेत वेगळे का बसविण्यात येते. घरातून शाळेत बसण्यासाठी गोणपाटे का न्यावी लागतात, काही शिक्षक आपल्या पुस्तकांना व वह्यांना हात का लावीत नाहीत, विटाळाच्या भीतीने प्रश्नसुद्धा विचारावयाचे टाळतात, ह्या गोष्टींचा भीमाला आता उलगडा झाला. आई बाजारात दुकानाच्या बाहेर उभी राहून लांबूनच का कपडा निवडी ह्याचे इंगित त्याला आता कळले. पाणी प्यायचे झाले तर भीमाने हाताची ओंजळी करून तोंड वर करावयाचे आणि कोणीतरी वरून पाणी त्याच्या तोंडात ओतावे असा भीमाला अनुभव आला. ह्या साऱ्या विटंबनेचे मूळ आपणास लोक अस्पृश्य लेखतात ह्यात आहे हे बाल भीमाला उमजू लागले. अस्पृश्यतेच्या कलंकाचा तो निष्ठूर असा परिपाक आहे. ज्या धर्मात राहून आपली अशी विटंबना होते त्या धर्माबद्दल साहजिकच त्याला तिरस्कार वाटू लागला. छोटा भीम इंग्रजी दुसरीत गेला. शाळेत त्याची प्रगती यथातथाच होती. वृत्तीने मात्र तो स्वतंत्र, निर्भीड, धाडसी, नि जिद्दी होता.

शाळेतील मुलांनी भीमाला अपमानाचे चटके कळत नकळत दिले. त्याने कशाकडेही लक्ष न देता अभ्यासात खंड पडू दिला नाही. तो प्रतिवर्षी परीक्षा उत्तीर्ण होत असे. वडिलांच्या उत्तेजनामुळे आणि काही उदारमनस्कांच्या सहानुभूतीमुळे अभ्यास नेटाने करून भीम मॅट्रिकची परीक्षा १९०७ साली उत्तीर्ण झाला. त्यानंतर लगेच त्यांचे लग्न रमाबाई नावाच्या मुलीशी झाले. भीमराव मुंबईतील एल्फिस्टन महाविद्यालयात शिक्षण घेऊ लागले. बडोदा नरेशांनी अस्पृश्यांना उत्तेजनार्थ आपण सहाय्य देऊ अशी घोषणा नगर भवनातील सभेत केली होती. गुरुवर्य केळुस्कर भीमाला घेऊन बडोदा नरेशकडे गेले. नरेशजींनी जे

प्रश्न विचारले त्याची उत्तरे भीमाने व्यवस्थित दिली. महाराज "बोले तैसा चाले" या वचनाचे प्रतीक होते. त्यांनी भीमाला मासिक २५ रु. ची शिष्यवृत्ती देण्याचे मान्य केले. महाविद्यालयात असताना भीमरावास तेथेही पिण्यास पाणी मिळत नसे. या आजूबाजूच्या वातावरणामुळे ते कष्टी होत असत. दलितांची दैन्यावस्था पाहून आणि त्यांच्या केविलवाण्या किंकाळचा ऐकून त्यांचे मन अस्वस्थ होत असे.

### उच्च शिक्षणासाठी परदेशगमन

भीमराव पदवीधर झाल्यानंतर त्यांचे वडील वारले. त्यांचा आधार तुटला. त्यावेळी ते बडोदा नरेशांना भेटले. त्या सुमारास बडोदा सरकारने उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन अमेरिकेला पाठविण्याचा विचार केला होता. भीमरावांनी अर्ज केला त्या चार विद्यार्थ्यांत भीमराव आंबेडकराची निवड झाली १९१३ च्या जुलै महिन्यात आंबेडकर न्यूयॉर्कला पोहोचले. "प्रत्येक माणसाच्या आयुष्यात जेव्हा संधीची लाट येते तेव्हा त्या संधीचा योग्य प्रकारे उपयोग त्याने केला तर त्या मनुष्यास वैभव प्राप्त होते." हे शेक्सपिअरचे वचन त्यांनी उद्धृत केले. अमेरिकेत त्यांनी 'प्राचीन भारतातील व्यापार' ह्या विषयावर प्रबंध लिहून १९१५ साली एम. ए. पदवी संपादन केली.

पुढे आठ वर्षांनी लंडनमधील पी. एस. किंग ॲन्ड सन्स ह्या प्रकाशन संस्थेने हा प्रबंध विस्तृत स्वरूपात 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक, वैत्तिक उत्क्रांती' या नावाने प्रसिद्ध केला. त्याच्या छापील प्रती कोलंबिया विश्वविद्यालयाला सादर करताच त्या विश्वविद्यालयाने रीतसर त्यांना 'डॉक्टर ऑफ फिलॉसाफी' ही पदवी दिली. नंतर त्यांनी बॅरिस्टरीचाही अभ्यास पूर्ण केला व काही काळ वकिली केली. सिडनहॅम कॉलेजमध्ये त्यांना हंगामी प्राध्यापकाची नोकरी मिळाली. प्राध्यापकीचा व्यवसाय हे काही आंबेडकरांचे अंतिम उद्दिष्ट नव्हते. ते एक साधन होते. पदोपदी आणि ठायी ठायी होणाऱ्या मानखंडनेमुळे अस्पृश्यतेचा मूलभूत प्रश्न हाती घ्यावा अशी त्यांच्या मनाला टोचणी लागली होती. आता भीमराव आंबेडकर हळूहळू राजकारणात प्रवेश करत होते.

### चळवळीच्या क्षितिजावर

चळवळीच्या क्षितिजावर आंबेडकरांचा उदय झाला तेव्हा परिस्थिती बरीच पालललेली होती. प्रश्नाचे स्वरूप अधिक क्लिष्ट झाले होते. राष्ट्रसभेची पडती कमान ब्रिटिश राज्यकर्त्यांचा प्रतिसाद, बदलते राजकीय राजकारणाचे संदर्भ, एकापाठोपाठ एक मंजूर होत असलेले सुधारणा कायदे, हिंदू – मुस्लिम तणावांचा वाढत चाललेला गुंता, अस्पृश्यांच्या प्रश्नाचे स्पष्ट होत चाललेले सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, मानसिक परिणाम या अनुषंगाने सामाजिक सुधारणा चळवळीची व्यापक करावी लागणारी कक्षा या सगळ्या घडामोडी नेतृत्वाचा कस पाहणाऱ्याच होत्या आणि संशोधक, तत्वचिंतक, सूत्रधार, प्रतिभा–संपन्न कर्ते–धर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व आव्हानांना सामोरे गेले. हजारो वर्षांत घडला नव्हता तो चमत्कार ते आपल्या टीचभर आयुष्यात करून गेले.

### 'मूकनायक' द्वारे जनजागृती

३१ जानेवारी १९२० मध्ये 'मूकनायक' नावाचे पाक्षिक त्यांनी काढले. या अंकात त्यांनी पाक्षिकाचे, उद्दिष्ट समर्थ, सुबोध, सरळ परंतु जोरदार आणि स्पष्ट भाषेत वाचकांपुढे मांडले.

विद्यार्थ्यांत ज्ञानाची आवड निर्माण व्हावी नि त्यांच्यात समाजसेवेची वृत्ती रुजून वाढावी या उद्देशाने ' सरस्वती ' हस्तलिखित मासिक सभेकडून प्रसिद्ध करण्यात येऊ लागले. रात्रीच्या शाळा सुरू केल्या. महारांचा हॉकी क्लब, क्रीडामंडळे स्थापन केली. अशा प्रकारे आंबेडकरांनी आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली. १९२७ साली सरकारने त्यांना विधिमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्त केले. महाड चवदार तळे या प्रकरणात आंबेडकरांचा विजय झाला तेथे सुरू झालेल्या सामाजिक स्वातंत्र्य युद्धापासून आणखी एक महत्वाची शक्ती निर्माण झाली. ती शक्ती म्हणजे डॉ.आंबेडकरांचे दैदिप्यमान व्यक्तिमत्व. आंबेडकरांचे कार्य आणि कीर्तीही भारताच्या कानाकोपऱ्यात पसरली. अस्पृश्य वर्गाला आंबेडकर त्यांच्या सौभाग्याचे आणि स्वातंत्र्याचे प्रतीक ठरले.

### घटनेच्या शिल्पकलेला प्रारंभ

राज्यघटनेचा मसुदा डॉ. आंबेडकरांनी तयार केला म्हणून त्यांना घटनेचे शिल्पकार म्हणतात. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची नवी राज्यघटना मंजूर झाली आणि २६ जानेवारी १९५० रोजी तिचा अंमल या देशात सुरू झाला.

### आंबेडकर लिखित राज्यघटनेतील नाविन्य

राजकीय लोकशाहीचे सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीत रूपांतर केले. राजकीय लोकशाही ही जर

सामाजिक लोकशाहीवर अधिष्ठित केली नाही तर ती टिकूच शकणार नाही कारण सामाजिक लोकशाही स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव ही जीवनाची तत्वे म्हणून ओळखते. स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव ही अखंड आणि अभंग अशी त्रिमूर्ती आहे. जर सामाजिक समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मूठभर लोकांचे जनतेवर राज्य असणे असा होईल. जर समता ही स्वातंत्र्यशून्य असेल तर ती व्यक्तीच्या जीवनातील स्वयंप्रेरणा नष्ट करील.या घटनेमुळे पददलित समाजाला मनुष्याला दर्जा मिळवून दिला.

आंबेडकराच्या आश्चर्यकारक कारकीर्दीचा गौरव करून कलकत्याचे अमृत बझार पत्रिका दैनिक म्हणते, " अन्यायी नि माणुसकीचे हक्क नाकारणाऱ्या समाजरचनेचा विध्वंस करण्याचा जणू आंबेडकरांच्या लढाऊ वृत्तीने विडाच उचलला होता. त्या थोर देशभक्तीचे सर्व देशबंधूना पुन्हा एकदा त्यांच्या मृत्यूने स्मरण करून दिले आहे."

" आबेडकरांच्या मृत्यूमुळे भारत एका खऱ्या महापुरुषाला मुकला " असे वीर सावरकर उद्‌गारले.

डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले, "आंबेडकर आमच्या घटनेचे शिल्पकार आहेत आणि त्यांची अनेक क्षेत्रातील सेवा विशेषतः दलितांच्या उद्धाकराकरिता केलेली सेवा फार महनीय आहे."

शेवटी धनंजय कीर असे म्हणतात की, " आंबेडकरांच्या जीवनाने हे सिद्ध केले की पददलित जातीच्या बीजामध्ये उत्कर्षाची शक्ती नष्ट झालेली नाही त्यांच्या ठायी असलेले धैर्य,पौरुष्य आणि सद्‌गुण जिवंत आहेत याचा हा भरमक्कम पुरावा आहे. जो मनुष्य आपल्या व्यक्तित्वाचा विकास अखंड, उद्योग, व्यासंग, तळमळ, कळकळ, अलौकिक धैर्य आणि स्वार्थत्याग या गुणावर करावयाचा निर्धार करतो."

" तिरस्करणीय गुलामगिरी नि अमानुष अन्याय याच्या गर्तेत पिचत पडलेल्या ज्या समाजात आंबेडकर जन्मास आले आहे त्या समाजातील गुलामगिरी त्यांनी नष्ट केली. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेनुसार अस्पृश्यतेचे उच्चाटन झाले आहे.अशा रीतीने विश्वभूषण आंबेडकर यांच्या अलौकिक जीवनाने भारतात ज्ञानाचे एक नवीन तीर्थ निर्माण झाले आहे. त्या जीवनातून एक नवी देवता अवतरली आहे आणि ह्या मंदिरमय देशातील त्या देवतेच्या मंदिरातील तो नंदादीप जगातील कुठल्याही कोपऱ्यातून प्रकाशत असलेला दिसेल."

" या युगातील पहिल्या श्रेणीतील अलौकिक पुरुषामध्ये त्यांचे स्थान आहे. जे आजवर पददलितांचे कैवारी होऊन गेले, मानवी स्वातंत्र्याचे शिल्पकार होऊन गेले त्यात त्यांचे स्थान उच्च आहे."

" महापुरुषाचे आयुष्य हे प्रचंड नदीसारखे असते. ते अखंडपणे वाहत असते. नदीच्या किनाऱ्यावरील रम्य स्थळांचे व सृष्टीसौंदर्याचे नवनवे दर्शन प्रत्येक पिढीस घडत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या महाचरित्राच्या बाबतीत हेच नेहमीच घडत राहील.

■

## ॥ राजर्षि छ. शाहू महाराज गौरवांजली ॥

**सर्व हिंदुस्थान राजकीयदृष्ट्या स्वावलंबी बनला पाहिजे व हिंदुस्थानातील प्रत्येक समाज धर्मदृष्टीने व व्यवहारदृष्टीने स्वतंत्र झाला पाहिजे ... राष्ट्रकार्य करायला ही दोन्ही कार्ये केली पाहिजेत, ही दोन्ही कार्ये सिद्धीला नेली पाहिजेत. लोकमान्य टिळकांनी यांपैकी पहिले कार्य उचलले. कोल्हापूरचे (छ. शाहू) महाराजांनी दुसरे कार्य उचलले ... दोघेही खंदे वीर होते, दोघांचीही कार्ये राष्ट्रास आवश्य होती.**

**श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर**

# गोकुळ प्रकल्प : एक अभ्यासभेट

शब्दांकनः कु. राणी साळोखे
तृतीय वर्ष कला

कोल्हापूर जिल्ह्यात सुप्रसिद्ध असलेला व संपूर्ण भारतात इ.स. १९८९–९० च्या दूध पावडर उत्पादनात "नॅशनल अॅवॉर्ड" मिळालेला गोकुळ दूध प्रकल्प या ठिकाणी तृतीय वर्ष कला स्पेशल समाजशास्त्र विभागाची बुधवार दिनांक २८–११–९० रोजी एक अभ्यासगट म्हणून शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आलेली होती. निसर्गरम्य वातावरणात त्याची उभारणी केलेली पाहिली. या कारखान्याचे प्रमुख उद्दिष्ट तसेच त्यांची दुय्यम उत्पादने दूध–पावडर, तूप, श्रीखंड, लोणी, चक्का आइस्क्रीम इत्यादी आहेत. गोकुळ प्रकल्पाची स्थापना प्रथम १६ मार्च १९६३ मध्ये ताराबाई पार्क येथे झाली. परंतु संघाचे प्रत्यक्ष कामकाज ५ जून १९६४ पासून सुरू झाले. सुरुवातीच्या काळात २० ते २५ कामगार होते. या काळात २६ संस्थांनी संघाकडे सरासरी प्रतिदिनी ७२६ लिटर दूध पुरवठा केला. त्यानंतर संघाची हळूहळू प्रगती होत गेली. त्यानंतर "पायलेट मिल्कस्किम" सुरू केली व संघाने संकलीत केलेले दूध मुंबई येथील शासकीय दुग्धालयात पाठविण्यास सुरूवात केली.

१ मे १९८५ रोजी शासकीय डेअरी हस्तांतरित झाली. तसेच शेअर भांडवल शेतकऱ्यांकडून उभारले गेले. शेतकरीच सभासद असतात. त्यांच्याकडून दूध घेतले जाऊ लागते. संघाची दुधाची प्रत राज्यात उत्तम आहे. जिल्ह्यात वेगवेगळया भागातून या प्रकल्पामध्ये साधारणतः तीन लाख लिटर दूध जमा होते. त्यापैकी दोन लाख ५० हजार लिटर दुधाची विक्री होते. उरलेल्या दुधामध्ये लोणी, तूप, पावडर इ. पदार्थ तयार केले जातात. दूध हे नाशवंत असल्यामुळे मशिनच्या साहाय्याने टँकला कोरडी वॉश दिली जाते. त्यामुळे दूध नासण्याचा धोका पोहोचत नाही. या टँकमध्ये दूध निर्जंतूकरण करून भरले जाते व ते दूध आठ ते दहा दिवस टिकते. दुधापासून श्रीखंड, तूप, लोणी, मलई, स्निग्धांशविरहित दूध–भूकटी इत्यादी पदार्थ तयार करता येतात. २२ तासामध्ये १० टन दूध पावडर तयार होते. त्याच्यासाठी १ लाख लिटर दूध लागते. होल मिल्क, स्किम मिल्क, बेबी दूध–पावडर इ. पावडर तयार होतात. आरे बटरही ते स्वतःच तयार करतात.

एका खोलीमध्ये एक असे ॲटोमॅटिक मशीन होते की, त्याच्यामधून जेवढया वजनाचे लोणी हवे तेवढे वजन ठेवून त्या वजनाची लोण्याची वडी बाहेर येत असे. पेपर बटर पॅकिंगच्या मशिनचा वेग इतका होता की, १०० ग्रॅमची एका मिनिटात ४० पाकीट तयार करते. २०० ग्रॅमची एका मिनिटात ३० पाकीटे तयार करते ५०० ग्रॅमची एका मिनिटात २० पाकीटे तयार करते.

ह्या बटलरला अँन्टी कलर असतो. हे पॅक करण्यासाठी एक खास पेपर घेतात की जो १२८ रु. मिटर आहे. हे सर्व बटर अगदी दगडासारखे घट्ट होईपर्यंत कोल्डरूममध्ये ठेवले जाते.

नंतर ते मेल्टींगमध्ये टाकून ते मेल्ट झाल्यावर घी बॉयलरवर तिथे त्याला १०८ ते ११० डिग्री सेल्सीअस पर्यंत उकळून म्हणजेच त्या लोण्यातील पाण्याचा अंश संपेपर्यंत ते तेथेच सेट करण्यात येते. नंतर ते फिल्टर करून सेटलिंग टँकला घेतले जाते व सेटलिंग टँक नंतर चार ते पाच दिवसानंतर लॅबोरेटरीत टेस्टींग करतात. नंतर जसे हवे तसे पॅकींग केले जाते. एक किलो व अर्धा किलो तूपाचे पॅकींग मार्केट दराप्रमाणे केले जाते. एका कॅनमध्ये ३५ किलो तूप भरलेले असते, तर डब्यामध्ये १५ किलो भरलेले असते. कोल्डरुममध्ये हवामान इतके थंड होते की, तिथे पाच मिनीटापेक्षा अधिक कोणत्याही व्यक्तीस थांबता येत नाही. जर जास्त वेळ थांबायचे असेल तर गम बूट, टोपी, उलनकोट वगैरे घालून जावे लागते. नंतर आम्ही पावडर विभागाकडे गेलो. तेथील मशिनरी खूप गुंतागुंतीची होती. तसेच एक बोर्ड होता त्या बोर्डावर प्लॉटचा नकाशा होता. स्टिमच्या सहाय्याने दूध उकळते. सेप्रेशननंतर मिल्क यू ऑपरेशन प्लॅटमध्ये

येते. व एक तासामध्ये पाच हजार शंभर लिटर दूध उकळते व दूध उकळून जे पाणी उरले असते ते पाणी कारंज्यासाठी वापरले जाते. २२ तासामध्ये १० टन पावडर तयार होते. व त्यासाठी एक लाख लिटर दूध लागते व एक एक किलो पावडरपासून साडेदहा लिटर दूध तयार होते. त्याचे पॅकिंग २५ किलोच्या तसेच १०० व ५०० ग्रॅम असे होते. पावडरला हवा लागली की पावडर दगडासारखी घट्ट होते. त्या पावडरचे गोडावून फार मोठे होते. गोकुळ दूध प्रकल्पातील उत्पादित पदार्थांची गुणवत्ता ही अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असून पावडरला भारतीय माणक संस्थेचे ( आय. एस. आय. ) मानचिन्ह मिळालेले असून तूप व लोण्यासाठी अॅगमार्क मिळाला आहे. ही पावडर कलकत्ता, बॉम्बे इतर अनेक ठिकाणी पाठविली जाते. या पावडरीस नॅशनल प्रोजेक्ट अॅवार्ड १९८९ ला मिळाले आहे. गोकुळ प्रकल्पाची सध्य:स्थिती वाहेरील सुधारलेल्या देशांशी तुलना केली तर गोकुळ प्रकल्पाचे काम बाहेरच्या देशांशी बरोबरीचे आहे.

या प्रकल्पात " दूध कामगार संघटना " या नावाची कामगार संघटना आहे. या संघटनेमधून कामगारास १५ हजार रु. कर्ज मिळते. या कामगार संघटनेमध्ये कामगार दरमहा काही रक्कम ठेव ठेवतात. कामगारांना अपघात झाल्यास वय, पगार, हुद्दा यांच्या प्रमाणावर नुकसान भरपाई दिली जाते व कुटुंबियांना योग्य ती मदत केली जाते. कामगार व वरिष्ठ अधिकारी यांच्यातील संबंध चांगले आहेत. कामगारांच्या तक्रारी व अडचणी योग्य असतील तर त्या सोडविण्याचा प्रयत्न वरिष्ठ अधिकारी करतात. डिसेंबर १९८४ मध्ये ताराबाई पार्क येथे कामगार प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले हे प्रशिक्षण १५ ते २० दिवसा पर्यंतचे असते. या प्रकल्पात कॉम्प्युटरायझेशन होणार आहे. याचा कामगारावर काहीही परिणाम होणार नाही. ज्या कंपनीकडून एखादे मशीन आले असेल त्या कंपनीकडे कामगारांना प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. वरील माहिती गोकुळ प्रकलपातील असि. मॅनेजर श्री. एस. व्ही. पाटील, डेप्यु. सेक्रेटरी श्री. बी. एस. महाडीक, एम. आय. एस., श्री. एस. के. माने या अधिकाऱ्यांनी व वाय. एस. शिकलगार हा कामगाराने सांगितली.

सदर अधिकारी वर्गाची कार्य तत्परता व कुशल कामगारांची जिद्ध या दुहेरी संगमाने हा दूध प्रकल्प सर्व महाराष्ट्रात नावलौकिकास येत आहे. प्रकल्पाची टापटीपता वाखाणण्यासारखी आहे. कर्तव्यदक्ष चेअरमन श्री. आनंदराव पाटील चुयेकर, मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैद्य साहेब व अधिकारी वर्ग व कुशल कामगार यांच्या अप्रतिम कष्टामुळे हा प्रकल्प प्रगती पथावर उभा आहे "उत्पादकता व सुरक्षितता ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत." हे वाक्य गोकुळ प्रकल्पातील मिटींग हॉलच्या इमारतीवर लिहीलेले आहे. दूध प्रकल्प पाहून झाल्यानंतर आम्ही सुसज्ज अशा मिटींग हॉलमध्ये गेलो व आम्ही प्रश्नोत्तरात्मक चर्चेला सुरवात केली. दरवर्षी अखेर जो फायदा मिळतो तो सभासदांच्या पुढील वर्षाच्या दूध दरात वाढीव दर म्हणून नफ्याच्या स्वरूपात समाविष्ठ होतो, कारण हा सहकारी तत्वावर आधारलेला प्रकल्प आहे. तसेच भविष्यासाठी सुद्धा त्यांच्या कामगाराविषयी तसेच प्रकल्पाविषयी योजना आहेतच त्या म्हणजे कामगारासाठी स्कूलबस, बससोय, क्रीडांगण, मनोरंजन साधने, निवाऱ्यासाठी घरांच्या सोयी इ. तसेच दुधाच्या उत्पादनात वाढ व कॉम्प्यूटरची सोय देखरेख करण्या-साठी अशा प्रकारे हा प्रकल्प नवीन नविन सुधारणा करून नवीन प्रगतीचे रुप धारण करीत आहे. असा हा हा भव्य प्रकल्प आशिया खंडातील प्रसिद्ध प्रकल्प आहे.

या शैक्षणिक सहलीसाठी आमच्या कॉलेजचे प्राचार्य, डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी मार्गदर्शन केले व या अभ्यास गटाचे आयोजन प्रा. ए. एम. साळोखे यांनी केले. शेवटी मान्यवर व्यक्तींचे आभार समाज–शास्त्र विभागाची विद्यार्थिनी कु. संजिवनी कुरणे हिने मानले.

बी. ए. भाग– ३

स्पेशल समाजशास्त्र विभाग गट प्रमुख

**कु. संजिवनी कुरणे**

**कु. पुष्पा पाटील**

**कु. राजश्री शेलार**

**कु. वंदना तावडे**

■

# वाघोबांचा कलाविष्कार

कु. सुरेखा जामसांडेकर
तृतीय वर्ष ( वाणिज्य )

पी. व्हीक्टर आकाशवाणीच्या मुंबई केंद्राचे केंद्र संचालक असतानाची गोष्ट. सरकारी कारभारात एखादी व्यक्ती जरा हुशारी दाखवायला लागली तर त्याच्यावर काय आपत्ती येऊ शकते याचा एक किस्सा. व्हिक्टर महाशयानी आपल्या केंद्राचे ' बालोद्यान ' कार्यक्रम अधिक रंगदार व्हावेत म्हणून एक शक्कल लढविली. ' प्राणिसंग्रहालयाची सफर ' या आपल्या साप्ताहिक कार्यक्रमात पशुपक्षांच्या आवाजाचे ध्वनि-मुद्रण ऐकवून हे कार्यक्रम अधिक जिवंत करण्याचे ठरविले. आता जी हकीगत आहे ती वाघाच्या डरकाळचा ध्वनिमुद्रित करण्याची.

त्याचे असे झाले. वाघाच्या डरकाळीचा अगदी चांगला आवाज ध्वनिमुद्रित करण्यासाठी प्राणिसंग्रहा-लयातील कर्मचाऱ्याने एक युक्ती सांगितली. वाघाच्या भोजनसमयी पिंजऱ्यामधे मटणाचा एक मोठा तुकडा टाकावयाचा मात्र त्या तुकडचाला एक दोरी बांधून ठेवायची व त्या दोरीचे टोक पिंजऱ्याबाहेर आपल्या हातात ठेवायचे. वाघाने मटणाकडे पाहून जिभल्या चाटायला सुरवात केली की हळूहळू दोरीच्या साहाय्याने मटण वाघापासून दूर ओढायचे. एक दोनदा असे झाले की वाघ चिडणार व जोरात डरकाळचा फोडणार त्यावेळी त्या आवाजाचे ध्वनिमुद्रण करायचे. हे तंत्र वापरले आणि असे ध्वनिमुद्रित गुरकावणे कार्यक्रमात सादर झाले. कार्यक्रम फारच छान झाला आणि व्हीक्टर महोदय तर अगदी खुश.

ही गोष्ट येथेच संपली तर त्याला सरकारी कसे म्हणावयाचे ? काही दिवसानंतर आकाशवाणी केंद्राचे ऑडीट आले. ऑडीट म्हणजे अगदी सरकारी ऑडीट. भारत सरकारच्या 'महालेखागार' (अकौंटंट जनरल) यांच्या कार्यालयाने ऑडीट सुरू केले. आकाशवाणी केंद्राच्या हिशेबामध्ये वाघासाठी आणलेल्या मटणाबाबत २ रुपये आठ आणे खर्च टाकले होते. ऑडिटरनी या खर्चावर आक्षेप घेतला. अशा प्रकारचे उत्कृष्ट खाद्य ही " कार्यालयीन गरज ". होती काय ? आणि कार्य कक्षेतील कोणत्या अधिकारास (अधिकार पात्राचा नंबर नमूद करावा) पात्र राहून हे करण्यात आले त्याचा खुलासा करावा असे ऑडिटरनी केंद्र संचालकांना कळविले. यावर चर्चा झाली, पार्श्वभूमी संगितली गेली. पुरावा दिला गेला. पण व्यर्थ. कारण काहीही असेल पण शेवटी भारत सरकारच्या निधीचा असा अपव्यय अजिबात समर्थनीय नव्हता. " याबाबतच्या खर्चाची वसुली संबंधिताकडून करून जवळच्या ट्रेझरीमध्ये रक्कम ताबडतोब भरावी आणि येथून पुढे असे दोष टाळण्यासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहे ते कळवावे " ऑडिट पार्टीने लिहिले.

केंद्रसंचालक सुद्धा कच्च्या गुरुचे चेले नव्हते. त्यानी उलट टपाली लिहिले– " अधिकार पत्रातील अमुक अमुक नंबर प्रमाणे केंद्र संचालकांना कलाकारीच्या मनोरंजनासाठी असा खर्च करण्याचा अधिकार आहे. सदर कार्यक्रमात वाघोबा हे एक 'कलाकार' असलेने सदर खर्च केंद्र संचालकांच्या अधिकारात बसतो. "

पण असे सहजासहजी समाधान झाले तर तो ऑडीटर कसला? त्यानी लिहिले " कृपया आपल्या ऑफीस मॅन्युअलमधील' कलाकार 'म्हणजे अशी व्यक्ती की एका बाजूला ' तो व्यक्ती ' आणि दुसऱ्या बाजूला ' गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया' अशा दोघांमध्ये झाला (अटी व शर्ती नमूद करून ) एक करार झाला असला पाहिजे तेव्हा कृपया सदर वाघोबा व गव्हर्नर जनरल यांच्या मधील कराराची सत्यप्रत पाठवून द्यावी. "

आता आली का पंचाइत, पण आकाशवाणी केंद्रातले लोकसुद्धा सरकारीच. ते काय गप्प बसतात. त्यांनी लिहिले–" महोदय, ऑफीस मॅन्युअलच्या कार्या-धिकाराखाली दिलेल्या एका 'फूट नोट' ला अनुसरून जर एखाद्या व्ही.आय.पी. (अति महत्त्वाची व्यक्ती) ला कार्यक्रमात सहभागी करून घेतले असेल तर त्यासाठी केंद्र संचालक आपल्या अधिकारात अशा कराराची अट शिथील करू शकतात. सदर वाघोबा हे रॉयल बेंगॉल टायगर (आणि संग्रहालयाच्या अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.) पैकी असल्याने एक व्ही.आय.पी. म्हणून केंद्र संचालकानी अत्यंत विचारपूर्वक, अशा प्रकारचा करार न करण्याचे ठरविले. तसेच सदर वाघोबानी आपल्या कलाविष्कारासाठी काहीही मानधन मागितलेले नाही ही गोष्ट सुद्धा लक्षात घेणेत यावी."

" ठीक आहे " ऑडीट ऑफीसरने लिहिले. " नियमांचे काटेकोर पालन हे अत्यंत आवश्यक आहे. उपरोक्त खुलाशास अनुसरून उपर्निदिष्ट ऑडीट ऑब्जेक्शन फाईल केले असे समजावे. " ■

(टाइम्स ऑफ इंडिया २१-३-९० वरून)

# प्रबल जीवनाचा फुलोरा

**कु. लता शिवाजीराव निंबाळकर**
तृतीय वर्ष कला

गरीब देशात मांणसाचे पीक जास्त. त्या देशात साधनाची अन् संधीची उपलब्धताच कमी, बेरोजगारीचे प्रमाण जास्त, शहरांकडे जाणाऱ्यांचे प्रमाण जास्त, शहरे म्हणजे एखादी नरकपुरीच जणू ! त्यामुळे शहरात अनेक प्रश्न उभे राहतात. 'योजनाबद्ध विकासाचा' प्रयत्न शासन करीत आहे. पण हा माणसाच्या पिकाचा राक्षस आपले आक्राळ विक्राळ हात पुढे करतोय.

माणसाच्या या पिकाला नियोजनबद्धपणे थांबवलं पाहिजे. कारण जे काही मिळवलं आहे ते फस्त व्हायची वेळ आलीय. हे पीक हंगामी नाही, कायम स्वरूपी आहे. गरीब देशांनी लोकसंख्या नियंत्रित करायची ठरविली. लोकसंख्येतल्या बदलाचा, स्त्री-पुरुषांच्या प्रमाणाचा, भौगोलिक विभागणीचा अभ्यास झाला आणि लोकसंख्याविषयक धोरण आखण्यात आले. नियोजनबद्ध आर्थिक विकास राबविण्यास सुरुवात झाली पण त्यात अपेक्षित घटकांना अपेक्षित यश येईना कारण त्यात अपेक्षित घटकांचा विचार झाला नाही. विकसनशील देशात ४० ते ४५ टक्के लोकसंख्या १५ वर्षांखालील मुलांमुलींची असते. हा वर्ग शिक्षणापासून वंचित राहिला. परिणामी कुटुंब नियोजन कार्यक्रमास व पर्यायाने लोकसंख्याविषयक धोरणास यावे तसे यश आले नाही.

लोकसंख्यावाढीचे परिणाम सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इ. क्षेत्रांत झालेले दिसून येतात. उपजीविकेच्या साधनांची निर्मिती व जननक्षमता यांच्यातील दरी वाढत आहे. त्यामुळे उपलब्ध साधने व पोसावयाची तोंडे यांचा मेळ बसत नाही. १९७१ ते १९८१ या दशकात भारताच्या लोकसंख्येत दरवर्षी १ कोटी ४० लाख इतकी भर पडलेली दिसून येते.

विकसनशील राष्ट्राच्या आर्थिक नियोजनात शेती उत्पन्न व ग्रामीण भागाची सुधारणा यांना अग्रक्रम देण्यात आला. परंतु शेतीच्या उत्पादनाला अनेक मर्यादा असतात हे लक्षात घेतले पाहिजे. शेतीच्या क्षेत्रात भारताने प्रगती केली आहे. परंतु लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी केवळ शेतीचे क्षेत्र उपयोगी नाही. तर तृतीय क्षेत्राला प्राधान्य दिले पाहिजे. शेतीचे उत्पन्न वाढले तरी भारतीयांचे पोषण सुधारले नाही. २,००० साली होणाऱ्या १०० कोटी ( अंदाजे ) लोकसंख्येसाठी दरवर्षी २० कोटी टनांपेक्षा अधिक अन्नधान्य उत्पादन करावे लागेल. तरच भारतीय जनतेला दरडोई आजच्या इतके अन्नधान्य उपलब्ध होईल. कुपोषणामुळे भारतात दरवर्षी १० लाख बालके मृत्यूमुखी पडतात. दारिद्र्यामुळे बालमृत्यू प्रमाण वाढते नोकरी व मिळकत याची शाश्वती नसते. म्हणून अधिक मुले असावीत अशी मनोधारणा होते. एखाद्या गरीबांला तू भरपूर भांडवल घालून एखादा व्यवसाय का करत नाहीस असे विचारणे जेवढे मूर्खपणाचे, तितकेच ज्याची मुले जगण्याची शाश्वती नाही अशा व्यक्तीला तू संतती नियमन का करत नाहीस असे विचारणे मूर्खपणाचे ठरेल. सुशिक्षित वर्ग संतती नियमन करतो तो काही देशात लोकसंख्या वाढते आहे म्हणून नव्हे किंवा ' आपल्याला दोन मुले पुरेत ' या राष्ट्रप्रेमामुळे नव्हे तर त्यांना लहान कुटुंबाच्या फायद्याची जाणीव झालेली आहे. गरीबांना एकच मूल असणे परवडण्यासारखे नाही कारण आपल्या देशात बालमृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. विशेषतः शहरातील संघटित कामगार वर्ग शिक्षक व त्यातल्या-त्यात आर्थिक परिस्थिती बरी असणारी कुटुंबे यांच्या-मध्ये कुटुंबनियोजनाचे महत्त्व पटले आहे. शहरात स्थलांतरित होणाऱ्या लोकसंख्येची समस्या गंभीर बनली आहे. तर गरीबीचा प्रश्न खेडोपाडी आहे. त्या प्रश्नाचे पहिल्यांदा उच्चाटन करणे आवश्यक आहे. तसेच भारतात नव्याने श्रीमंत होत असलेला वर्ग भारतासारख्या गरीब देशाला न परवडणाऱ्या आपल्या संस्कृतीला न शोभणाऱ्या भोगवादाचे प्रदर्शन करत आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

लोकसंख्या व गरीबी या प्रश्नाचे आकलन आपल्या परिस्थितीच्या संदर्भात बरोबर करून लोक-संख्येची वाढ जरूर कमी केली पाहिजे. या समस्येला

राष्ट्रीय कार्यक्रमांत अग्रक्रम दिला पाहिजे. कुटुंब नियोजनाची मोहीम ही शासनाची मोहीम न राहता जनतेची मोहीम कशी होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. पण दुर्दैवाने शासनाचे या संबंधीचे प्रयत्न चुकीच्या मार्गाने गेले आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात गेली ४० वर्षे सरकाने लोकसंख्या व गरीबी या संबंधी अनेक कार्यक्रम राबविले यात काही प्रमाणात यश आले परंतु जास्त अपयशच पदरात पडले. याचे प्रमुख कारण म्हणजे ते कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पाडले गेले नाहीत. कुटुंब कल्याण कार्यक्रम लोकसंख्या वाढीचे प्रमाण कमी करण्यासाठी महत्वाचा आहे पण त्याहीपेक्षा महत्वाचा कार्यक्रम म्हणजे विवाहाचे वय वाढविणे आणि दोन मुलांमध्ये अधिक अंतर ठेवणे. तसेच आपले कुटुंब मर्यादित ठेवण्यासाठी ग्रामीण जनता, झोपडपट्टया अशिक्षित लोकांमध्ये कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा प्रसार होण्याची गरज आहे. ही प्रेरणा शून्यातून निर्माण होत नाही तर मानवी वर्तणुकीत योग्य असे परिवर्तन घडण्यासाठी काही क्रिया–प्रक्रिया व्हाव्या लागतात. कुटुंब मर्यादित ठेवण्यासाठी आजूबाजूच्या व सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असते. या परिस्थितीचे मुख्य घटक बालमृत्यू कमी करणे, महिलांचे शिक्षण, रोजगार, कुटुंबाला पुरणारे वेतन आणि आजार, अपघात, वृद्धापकाळ इ. संकट काळासाठी सामाजिक सुरक्षा हे आहेत. म्हणून हे आर्थिक व सामाजिक उद्दिष्ट पूर्ण करण्याला प्रथम प्राधान्य द्यावयास पाहिजे. यामुळे दारिद्रय नष्ट होईल. माणसाला ' माणूस ' म्हणून जगता येईल.

कुटुंब कल्याण ही ' जनतेची मोहीम ' व्हायची असेल तर त्यासाठी प्रथम सर्व क्षेत्रांतील नेते मंडळींनी आदर्श घालून दिला पाहिजे. खासदार, आमदार, जिल्हा परिषद, नगरपालिका व ग्रामपंचायती यामध्ये निवडून गेलेले लोकप्रतिनिधी, सहकारी संस्थांमधून निवडून आलेले सदस्य तसेच शासनाचे अधिकारी, शिक्षक, प्राध्यापक अशा सर्व स्तरावरील नेतृत्व करणाऱ्या संतती-नियमन करून एक किंवा दोन मुलाचे मर्यादित कुटुंब असावे असा जनतेला आदर्श घालून दिला पाहिजे. तरच नेत्यांना आमजनतेला कुटुंब कल्याण करण्यासंबंधीचा उपदेश करण्याचा नैतिक अधिकार मिळेल सक्तीपेक्षा आदर्श घालून देणे हा जनजागृतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

विकासात्मक धोरणात शिक्षणाला फार महत्व आहे. सामाजिक व आर्थिक प्रगतीचा कणा म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाने व्यक्तिविकास होतो. सुधारलेले व्यक्तिमत राष्ट्राच्या प्रगतीस हातभार लावते. भारतातील शिक्षणाचे प्रमाण व दर्जा सुधारावयाचा असेल तर शिक्षणसंस्थांवर पडणारा कामाचा बोजा कमी होणे व नव्या शिक्षणसंस्था अस्तित्वात येणे जरूरीचे आहे यासाठी लोकसंख्या नियंत्रणाशिवाय दुसरा पर्याय नाही. भारतात दारिद्रय निर्मूलन, शिक्षण व आरोग्य या कार्यक्रमांबरोबर प्रबल लोकजीवन प्रेरणांच्या फुलोऱ्यातून भारतीय जीवन फुलेल.

■

## ॥ राजर्षि छ. शाहू महाराज गौरवांजली ॥

**राजर्षि शाहू महाराजांनी उभ्या केलेल्या शैक्षणिक चळवळीचे सूत्र मक्तेदारीकडून सार्वजनिकतेकडे जाणारे आहे. खाजगत हितसंबंधाकडून सामाजिक कल्याणाकडे ते नेणारे आहे. विषततेने किडलेल्या आणि जातिभेद पंथांनी नासलेल्या समाजजीवनाला समानतेच्या पातळीवर आणणारे आहे.**

**– डॉ. एस्. एस्. भोसले**

# पंजाब व काश्मीर प्रश्न

**कु. नूतन जयसिंगराव ओतारी**
तृतीय वर्ष कला

### पंजाब प्रश्नाचे स्वरूप

आज भारताला स्वातंत्र्य मिळून ४० वर्षे होऊन गेली व त्यानंतर निर्माण झालेले हे प्रश्न आहेत. म्हणजेच हे प्रश्न फार पूर्वीपासूनचे आहेत आणि तरीही ते न सुटता अधिकाअधिक गुंतागुंतीचे बनत आहेत आपण जर या समस्येकडे दूरपर्यंत पाहिले तर याची सुरुवात पंजाबनेच झाल्याचे दिसून येते. हे प्रश्न निर्माण होण्यापूर्वी पंजाब हा भारताचाच एक अविभाज्य घटक आहे असे सर्व भारतीयांच्याप्रमाणेच तेथील शीख बांधवांचेही मत होते. परंतु काही परदेशांच्या प्रलोभनाला बळी पडून आज तेच शीख बांधव आपल्या वेगळ्या भागाची मागणी करत आहेत. त्यांना पंजाब प्रांत भारतात नको आहे तर तेही एक स्वतंत्र राष्ट्र व्हावे असे त्यांचे मत आहे आणि वेगळ्या 'खलिस्तान' साठी ते आज दंगली करत आहेत, लोकांच्यात दहशत निर्माण करून असंतोष पसरवीत आहेत.त्याचप्रमाणे आज काश्मीर प्रश्नानेही सर्व भारताचे लक्ष वेधून घेतले आहे. एकीकडे पाकिस्तानने पंजाबमधील शीख लोकांना प्रलोभने दाखवून खलिस्तानची मागणी करण्यास भाग पाडले तर दुसरीकडे त्यांनी काश्मीर प्रांत पाकिस्तानात सामावून घेण्यासाठी दंगली सुरू केल्या. कारण काश्मीर मधील अधिकात अधिक जनता मुस्लीम आहे व त्यामुळे काश्मीरचा संपूर्ण भाग पाकिस्तानात सामावून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

### भारत सरकारला आव्हान

पंजाब व काश्मीर प्रश्नाने आता इतके उग्र स्वरूप धारण केले आहे की भारत सरकारला ते एक आव्हानच उरले आहे. या प्रश्नाकडे लवकरात लवकर लक्ष देऊन तोडगा काढला पाहिजे. कारण हे प्रश्न भारताच्या विभाजनास प्रारंभ करणारे प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविल्याने देशाला एकप्रकारचे स्थैर्य, विश्वास मिळणार आहे. हे प्रश्न सोडविणे म्हणजे भारताच्या घटनेला एकप्रकारचे आव्हानच आहे.

### दहशतवादाची वाटचाल

आज पंजाब व काश्मीरातील वस्तुस्थिती पाहिली तर अत्यंत धोकादायक आहे. लोकांना आपण आणखी तासभर तरी जिवंत राहू की नाही याबाबत खात्री देता येत नाही. त्यांचा स्वत:वरचाही विश्वास उडाला आहे. हे अतिरेकी आज देशाला पोखरीत आहेत. दिवसेदिवस या अतिरेक्यांची संख्या, त्यांच्या चळवळी वाढत आहेत. आज लोकांना दिवसाही फिरणे भीतीदायक झाले आहे. इतकेच नव्हे तर भारताच्या पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांना मारण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. यावरून तर स्पष्टपणे या समस्येचे गांभीर्य स्पष्ट होते. आणि जे अतिरेकी पंतप्रधानांसारख्या व्यक्तीला मारण्यात यशस्वी होत असतील, त्यात त्यांना कोणताही संकोच, भीती वाटत नसेल तर आपल्यासारख्या निरपराधांचा ते कदापि विचार करणार नाहीत. भारताचे माजी पंतप्रधान श्री. व्ही. पी. सिंग हे पंजाबला जाऊन सुखरूप आले हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल. कारण हे अतिरेकी केवळ या मंत्र्यांना, वरिष्ठ व्यक्तींना मारण्याच्या संधीची वाट पहात आहेत व जास्तीत जास्त दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही असुरक्षितता दहशत नष्ट करण्यासाठी प्रचंड संरक्षणाची गरज आहे. आहेत त्यापेक्षा अधिक संरक्षणाच्या सोयी पुरविल्या पाहिजेत कारण हेच लोक सुरक्षित राहिले तर या प्रश्नावर तोडगा काढू शकतील.

समाजाच्या अंतर्गत सुव्यवस्थेला व सुरक्षिततेलाच धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे लोकांचा केंद्रसरकार व राज्य सरकारवरचा विश्वासच उडाला आहे. लोक भयभीत झाले आहेत. साहजिकच स्थलांतर वाढले आहे. यातूनच एका नव्या समस्येला सुरुवात झाली आहे. दिल्लीतील निर्वासितांचे कँपस् तर आता सर्वत्र प्रसिद्ध झाले आहेत निर्वासितांच्या नोकऱ्यांचा प्रश्न, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, त्यांच्या राहण्याच्या

सोयींचा प्रश्न साहजिकच उत्पन्न झाला आहे. बँका लुटण्याच्या प्रकारांना ऊत आला आहे. भारतात दिवसाही लोकांचे अपहरण होत आहे. या अशांततेचा फायदा काही समाजविघातक लोक घेत आहेत. ते अंमली पदार्थ व शस्त्रास्त्रांची बेजबाबदारपणे देवाण-घेवाण करत आहेत. आणि अर्थव्यवस्थेचा गैरफायदा घेत आहेत. भारतातील प्रत्येक शहरातील देशविरोधी संघटनांच्या हाती शस्त्रास्त्रे आहेत. अशी शस्त्रे वापरून ते दहशत पसरवीत आहेत. आज पंजाब व काश्मीर प्रश्न त्यांच्यापुरताच मर्यादित न राहता व्यापक बनला आहे. आज केवळ तिथल्याच लोकांचे जीवन असुरक्षित न राहता सर्व देशातील लोकांचेही जीवन असुरक्षिततेचे झाले आहे. आता केवळ खाजगी वाहनानाच धोका राहिला नाही तर रेल्वे, एस. टी. यासारख्या सरकारी वाहनामध्येही बाँब-स्फोट होत आहेत. थोडक्यात या समस्येची व्यापकता राष्ट्राच्या काना-कोपऱ्यापर्यंत पोहचली आहे. त्यातूनच जातीय-वादाची निर्मिती होत आहेत. सध्या पंजाबात असंख्य हिंदुची अक्षरशः कत्तल होत आहे. आणि त्याचे प्रति-उत्तर म्हणून की काय अनेक निरपराध शीख बांधवही बळी जात आहेत. थोडक्यात या समस्येने आता हिंसक रूप धारण केले आहे. आणि अहिंसकवादी भारत देश आता हिंसक आणि अंतर्गत असुरक्षित राष्ट्र म्हणून ओळखला जाऊ लागेल की काय अशी शंका वाटू लागली आहे.

## पंजाब समस्येने निर्माण केलेले प्रश्न

पंजाब व काश्मीरचा प्रश्न सोडविता-सोडविता सरकारपुढे अनेक नवे प्रश्न निर्माण होत आहेत. जसे-राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न, सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न, शांतता, सुव्यवस्था व लोकशाही प्रशासनाचा प्रश्न, घटनेला आव्हान देणारे प्रश्न, घटनात्मक पेच-प्रसंग, राष्ट्रपती, पंतप्रधान यांची पदे व अधिकार यांना आव्हानात्मक प्रश्न निर्माण झाले आहेत.

